cmyk

## संपादकीय

### राष्ट्रपतींनाही कालमर्यादा

तामिळनाडू सरकारने मंजूर केलेली १० विधेयके अडवून ठेवण्याची कृती बेकायदेशीर असल्याचे निरीक्षण नोंदवून त्यांना फटकारणा-या सर्वोच्च न्यायालयाने आता राष्ट्रपतींनाही विधेयकावर निर्णय घेण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींसाठी वेळेची मर्यादा निश्चित करण्याची ही पहिलीच वेळ आहे. राज्यपालांकडून राष्ट्रपतींकडे पाठवलेली विधेयके आता तीन महिन्यांच्या आत राष्ट्रपतींना निकाली काढावी लागतील, असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. तामिळनाडू सरकारच्या याचिकेवरील निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली.

# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### राहुल गांधी, सोनिया गांधींविरोधात आरोपपत्र दाखल

नवी दिल्ली : नॅशनल हेराल्डमधील कथित आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी ईडीने मोठी कारवाई केली आहे. ईडीने काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी तसेच खासदार राहुल गांधी यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल केले आहे. पुढील सुनावणी २५ एप्रिल रोजी होणार आहे. या आरोपपत्रात काँग्रेसचे सॅम पित्रोदा, सुमन दुबे तसेच अन्य लोकांचीही नावे आहेत.

बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३५१ | बुधवार, दि.१६ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### संभाजी भिडे गुरुजी यांच्यावर कुत्र्याचा हल्ला

सांगली–सांगलीमध्ये शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे गुरुजी यांच्यावर कुत्र्याचा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. संभाजी भिडे गुरुजींच्यावर कुत्र्याने हल्ला करत डाव्या पायाचा चावा घेतला आहे. शहरातील माळी गल्ली या ठिकाणी हा प्रकार घडला आहे. शासकीय रुग्णालयात संभाजी भिडे गुरुजींवर उपचार करण्यात आले आहेत.

### महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा भूकंप?

मुंबई–आता विरोधी पक्षांची स्पेस भरून काढण्याच्या निर्धाराने तीन बडे नेते येणारे एकत्र पुण्यात तीनही नेत्यांचा होणार मेळावा राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर यांची एकत्रित आघाडी येत्या रविवारी होणार युवा संघर्ष निर्धार परिषद २०२५ खोट्या आश्वासनांना कंटाळलेल्या तरुणांचा बुलंद निर्धार.! या टॅगलाईन खाली युवा संघर्ष निर्धार परिषद २०२५ होणार आहे.

### कर्जमाफीसाठी अनोखे आंदोलन

मुंबई–शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्याचे स्मशान भूमीत अनोखं आंदोलन सुरु केले आहे. स्मशानभूमीतल्या चितेवर झोपून आंदोलनाला सुरुवात केली आहे. कारभारी म्हसलेकर असे या ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्याचे नाव आहे. बदनापूर तालुक्यातील केळीगव्हाण या गावात आंदोलनाला आजपासून सुरुवात झाली आहे.

### दादा निधी देत नाहीत, शिंदेंची शाहांकडे तक्रार–राऊत

मुंबई–अजितदादा निधी देत नाहीत, अशी तक्रार एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे तक्रार केली, असे खासदार संजय राऊत म्हणाले. त्यावर शिंदेंची शाहांनी त्यांच्या पद्धतीने समजूत काढल्याचे ते म्हणाले.

### धाराशिव जिल्ह्यात उष्णतेची लाट

धाराशिव –जिल्ह्यात आजपासून १७ एप्रिलपर्यंत उष्णतेची लाट राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी पारा ४२ ते ४४ अंशांवर जाण्याची शक्यता आहे. तसेच हवेत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे धाराशिव जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे.

### नाशिकची द्राक्ष निर्यात एक लाख मेट्रिक टन टप्पा पार


नाशिक – द्राक्ष निर्यात एक लाख मेट्रिक टन टप्पा पार झाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत निर्यातीत २० टक्के घट झाली. यंदा हंगामाच्या सुरुवातीला झालेल्या अवकाळी पावसामुळे द्राक्ष उत्पादनावर परिणाम झाला. मार्च आर्थिक वर्षअखेरपर्यंत ८ हजार कंटेनरमधून १ लाख १० हजार मेट्रिक टन द्राक्षांची निर्यात झाली. युरोपियन देशांसह रशिया, फ्रान्स, युक्रेन, बेल्जियम, इंग्लंड, नॉर्वे, नेदरलँड, स्वीडन, पोलंड, स्पेनसह आदी देशांत द्राक्ष निर्यात करण्यात आले. उत्पादनात २० टक्के घट होऊनही, यंदा निर्यात झालेल्या द्राक्षांना ९० ते १२५ रुपये प्रति किलो दर भाव मिळाला आहे.

# देशात यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार

## नविन अंदाज; महाराष्ट्रात मान्सूनची काय स्थिती?

मुंबई । प्रतिनिधी

**देशात गेल्या काही वर्षांपासून वातावरणात सातत्याने बदल होत आहेत. मार्च महिन्यापासून देशात उकाडा सुरू झाला आहे. एप्रिल – महिन्यात तापमानाचा पारा आणखी वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. त्याचबरोबर देशात यंदा मान्सूनला पोषक स्थिती राहील, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. तसेच, देशात यंदा सरासरीपेक्षा अधिक**



पाऊस यंदा होऊ शकतो, असेही म्हटले आहे. तसेच महाराष्ट्रात देखील चांगला पाऊस असणार आहे.

### यामुळे चांगला मान्सून असणार

प्रशांत महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान तटस्थ राहण्याची शक्यता असून सरासरीच्या तुलनेत आयओडीही तटस्थ राहील. यासह उत्तर गोलार्धामध्ये हीम अच्छादनाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी असेल, ही परिस्थिती चांगल्या मान्सूनसाठी लाभदायी ठरते. त्यामुळे देशात यावर्षी सरासरीपेक्षा अधिकचा पाऊस बरसण्याची शक्यता आहे.

देशात २०२५मध्ये जून ते सप्टेंबरदरम्यान सरासरीच्या दरम्यान १०५ टक्के पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पश्चिम आणि दक्षिण भारतात चांगला पाऊस होईल. तर महाराष्ट्रात पुरेसा पाऊस कोसळणार आहे. मान्सूनवर अल निनोचा धोका नसल्याने देशात चांगला पाऊस पडणार आहे. भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्यूंजय महापात्रा आणि शास्त्रज्ञ आर. के. जेनामणी यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन याबाबतची माहिती दिली आहे. आयएमडीचा पुढील अंदाज मेच्या शेवटच्या आठवड्यात जारी करणार आहेत. नैऋत्य मान्सून १०५ टक्के वर राहू शकतो. त्याचवेळी अल निनोची स्थिती तटस्थ राहू शकते. मराठवाड्यात यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस असेल. तर, मध्य महाराष्ट्रातही चांगल्या पावसाची अपेक्षा असणार आहे. यासह कोकण आणि विदर्भातही पाऊस सरासरी

पान २ वर

# पत्नी बरोबर अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरुन युवकाचा खून

## भर रस्त्यावर खुनाच्या घटनेने माजलगाव हादरल;आरोपी पोलिस ठाण्यात शरण





माजलगाव । प्रतिनिधी

**शहरातील स्वामी समर्थ केंद्र परिसरात दि १५ एप्रिलमंगळवार रोजु दुपारी २:०० वाजण्या सुमारास एका युवकाच्या खुनाच्या घटनेने माजलगाव शहर हादरले आहे. बाबासाहेब प्रभाकर आगे असे मृताचे नाव असून तो किटी आडगाव येथील रहिवासी आहे. दरम्यान, कोयत्याने वार करून खुश केल्यानंतर आरोपीनारायण शंकर फपाळ स्व:ता पोलिस ठाण्यात शरण आला.**

यासंदर्भात मिळालेली माहिती अशी की,दि १५ एप्रिल मंगळवार रोजी दुपारी बायपासवर बाबासाहेब आगे याचा हातात कोयता घेऊन नारायण शंकर फपाळ हा पाठलाग करत होता.आगे जिवाच्या आकांताने पळत पळत माजलगाव बस स्थानकापासून जवळच असलेल्या शाहूनगरकडे गेला. मात्र,तेथे जवळच असलेल्या

पान २ वर

### उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांची घटना स्थळी भेट

खुनाची घटना घडल्या नंतर एका तासांतच उपविभागीय पोलिस अधिकारी अतिरिक्त पदभार माजलगाव चोरमले यांच्यासह पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ,तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक सतीष दिंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

# धनंजय मुंडेंकडे ११ मोबाईल नंबर करुणा शर्मांकडून मोठा गौप्यस्फोट

मुंबई । प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसापांसून करुणा शर्मा वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत. त्यांनी याआधी माजी मंत्री यांच्यावर अनेक अरोप केले आहेत. त्यानंतर आता आवादा कंपनीची बैठक धनंजय मुंडे यांच्या निवासस्थानी झाली होती. त्यामुळे याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करुणा शर्मा यांनी केली आहे. तसेच धनंजय मुंडे यांच्याकडे एकूण ११ मोबाईल क्रमांक आहेत. या मोबाईल क्रमांकाचा सीडीआर तपासला तर संपूर्ण कच्चाचिठ्ठा समोर येईल, असा गौप्यस्फोट करुणा शर्मा यांनी केला आहे. शर्मा यांच्या खळबळजनक दाव्यानंतर आता वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे.**

करुणा शर्मा म्हणाल्या, मी कधीही माझ्या नवऱ्याची किंवा स्वत:च्या मुलाचीही पाठराखण कधीच करणार नाही. धनंजय मुंडे हे दोषी आहेत, असे मी कधीही म्हणालेली नाही. ते कदाचित दोषी ठरू शकतात. कारण त्यांच्या बंगल्यावरच आवादा कंपनीची बैठक झाली होती. तुम्ही याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करुणा शर्मा यांनी केली. तसेच, धनंजय मुंडे यांचे एकूण ११ मोबाईल क्रमांक आहेत. हे सर्व मोबाईल क्रमांक माझ्याकडे आहेत. या मोबाईल क्रमांकाचा सीडीआर काढावा. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ते ११ नंबर हवे असतील तर मी त्यांना ते देऊ शकते, असेही करुणा शर्मा म्हणाल्या.

# एसटी कर्मचाऱ्यांचे थकलेले ४४ टक्के वेतन जमा

## बँकेकडून अखेर आला तो मेसेज; सरकारकडून निधीची तरतुद





मुंबई । प्रतिनिधी

सर्व एसटी कर्मचारी व अधिकाऱ्यांचे उर्वरित वेतन (४४ टक्के) त्यांच्या बँक खात्यावर जमा झाले आहे. निधीअभावी एसटी महामंडळाकडून मार्च महिन्याचे ५६ टक्के वेतन वितरीत केले होते. आता सरकारकडून

पान २ वर

### एकनाथ शिंदेंकडून तात्काळ दखल

उपमुख्यमंत्री एकनात शिंदे सांगोला दौऱ्यावर असताना काही एसटी कर्मचाऱ्यांनी त्यांची भेट घेतली होती. आमचे उर्वरित वेतन लवकर दिले जावे अशी मागणी त्यांनी यावेळी केली होती. यानंतर एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मागणीची दखल घेतली होती. त्यांनी राज्याचे वित्त सचिव ओमप्रकाश गुप्ता यांच्याशी याबाबत चर्चा केली होती. त्यानंतर ओमप्रकाश गुप्ता यांनी मंगळवारपर्यंत कर्मचाऱ्यांचे वेतन येईल असे स्पष्ट केले होते. त्यानुसार एसटी कर्मचाऱ्यांना त्यांचे उर्वरित वेतन प्राप्त झाले आहे.

# शासनाच्या या लाडक्या बहिणींना मिळणार फक्त ५०० रुपये

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवरुन सुरु असलेल्या चर्चांवर सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. नमो शेतकरी महानस्मान निधी योजना आणि प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थी महिलांना लाडकी बहीण योजनेच्या शासन निर्णयानुसार दरमहा ५०० रुपये मिळणार आहेत. योजनेच्या नियमात कोणताही बदल केलेला नाही, असे आदिती तटकरे यांनी सांगितले आहे.**

## पीएम किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी महासन्मानच्या लाभार्थ्यांना फटका



महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवरुन सुरु असलेल्या चर्चेवर भाष्य केलं आहे. त्यांनी सरकारची बाजू मांडली आहे. त्या म्हणाल्या, दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार इतर कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ न घेणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी

पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ६४.५० क्विंटल | २,३५० | ३,०६१ | २,६०६ |
| ज्वारी/हायब्रिड: २३०.५० क्विंटल | १,८०० | ३,४०१ | २,४१७ |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : २८.०० क्विंटल | ५,९०० | ७,०५१ | ६,८५४ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५३.५० क्विंटल | २,१०० | २,६३६ | २,४२९ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:३७.०० क्विंटल | ४,३०० | ४,४८० | ४,४१० |
| हरभरा: २४.५० क्विंटल | ५,२०० | ५,४५० | ५,३३२ |

# मंत्री उदय सामंत यांचा बीड जिल्हा दौरा

## गुंतवणूक परिषद घेणार; जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार



बीड । प्रतिनिधी

**उद्योग मंत्री उदय सामंत १६ एप्रिल रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत सकाळी १०:३० वाजता जिल्हा गुंतवणूक परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेमध्ये बीड जिल्ह्यातील उद्योगांना चालना देण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे.**

परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यातील औद्योगिक विकासासाठी अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जाणार असून, यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या

पान २ वर

# नेकनूरमध्ये पित्याकडूनच मुलीवर अत्याचार



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतून नात्याला काळिमा फासणारी ही घटना समोर आली आहे. जन्मदात्या पित्यानेच आपल्या ११ वर्षीय मुलीवर अत्याचार केला. या नराधम पित्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेकनूर येथील एका गावात पती–पत्नीमध्ये घरगुती कारणावरून वाद झाला होता. या वादातून आरोपीची पत्नी पुण्याला निघून गेली. तर, मुलगी घरी एकटी होती. शुक्रवारी रात्री राहत्या घरातच नराधम पित्याने पोटच्या

पान २ वर

# प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधीबाबत सरकारचा नवा निर्णय!

## ‘या’ एका कागदपत्राशिवाय पुढचा हप्ता मिळणार नाही?





नवी दिल्ली । वृतसंस्था

**सरकारने एक नवीन शेतकरी ओळखपत्र अनिवार्य केले आहे आणि ते बनवण्यासाठी आता फक्त काही दिवस उरले आहेत. जर हे ओळखपत्र वेळेत बनवले नाही, तर तुमच्या हक्काचा २० वा हप्ता थांबू शकतो, असे आता स्पष्ट झाले आहे.**

प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजना ही शेतकऱ्यांच्या आर्थीक मदतीसाठीची योजना आहे ज्याच्या योजनेअंतर्गत केंद्र सरकारकडून दरवर्षी शेतकऱ्यांना ६ हजार रुपयांची आर्थिक मदत थेट बँक खात्यात पाठवली जाते. ही रक्कम दर चार महिन्यांनी २ हजार रुपयांच्या हप्त्यांमध्ये वितरित केली जाते. प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेचे लाभार्थी असाल तर ही बातमी तुमच्यासाठी धक्कादायक ठरू शकते! कारण योजनेचा पुढचा हप्ता वेळेवर मिळणार की थांबणार, हे आता एका नव्या कागदपत्रावर अवलंबून असणार आहे. केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला असून, ‘शेतकरी ओळखपत्र’ नसल्यास योजनेचा पुढील हप्ता थेट तुमच्या खात्यात जमा होणार नाही, अशी स्पष्ट शक्यता वर्तवली जात आहे. आतापर्यंत १९ हप्त्यांचे पैसे मिळाले असले तरी २०वा हप्ता मिळवण्यासाठी हे ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे.

### शेतकरी ओळखपत्र म्हणजे नेमकं काय ?

हे ‘शेतकरी ओळखपत्र’ म्हणजे एक प्रकारचे डिजिटल आयडी कार्ड असणार आहे. यामध्ये शेतकऱ्याची वैयक्तिक माहिती, जमिनीचा तपशील आणि इतर सरकारी योजनांशी संबंधित माहिती नोंदवली जाणार आहे. या ओळखपत्रामुळे भविष्यातील सर्व सरकारी मदतीचे वितरण अधिक सोपं आणि पारदर्शक होणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

cmyk

## अग्रलेख

# राष्ट्रपतींनाही कालमर्यादा

तामिळनाडू सरकारने मंजूर केलेली १० विधेयके अडवून ठेवण्याची कृती बेकायदेशीर असल्याचे निरीक्षण नोंदवून त्यांना फटकारणा-या सर्वोच्च न्यायालयाने आता राष्ट्रपतींनाही विधेयकावर निर्णय घेण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींसाठी वेळेची मर्यादा निश्चित करण्याची ही पहिलीच वेळ आहे. राज्यपालांकडून राष्ट्रपतींकडे पाठवलेली विधेयके आता तीन महिन्यांच्या आत राष्ट्रपतींना निकाली काढावी लागतील, असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. तामिळनाडू सरकारच्या याचिकेवरील निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने ही टिपण्णी केली. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

घटनेच्या कलम २०१ अंतर्गत राष्ट्रपतींच्या निर्णयासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नसल्यामुळे हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. न्यायालयाने सरकारिया आयोग आणि पुंछी आयोगाचाही उल्लेख केला. ज्यामध्ये कलम २०१ अंतर्गत प्रकरणे निकाली काढण्यासाठी निश्चित कालमर्यादा स्वीकारण्याची शिफारस करण्यात आली होती. अनुच्छेद २०१ अंतर्गत राष्ट्रपतींना विधेयकाचा विचार करावा लागतो आणि हे काम वेळेच्या मर्यादेमुळे मर्यादित असू शकते हे आम्हाला मान्य आहे; परंतु ही वस्तुस्थिती राष्ट्रपतींच्या निष्क्रियतेचे समर्थन करू शकत नाही, असे निकाल पत्रात म्हटले आहे. या प्रकरणावर न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, जर एखाद्या संवैधानिक प्राधिकरणाने वाजवी वेळेत आपली कर्तव्ये पार पाडली नाहीत तर न्यायालये त्यामध्ये हस्तक्षेप करू शकतील. जेव्हा राज्यपाल राष्ट्रपतींच्या विचारार्थ विधेयके राखून ठेवतात आणि राष्ट्रपती त्याला संमती देत नाहीत तेव्हा राज्य सरकारला अशा कारवाईला या न्यायालयात आव्हान देण्याचा अधिकार असेल. खंडपीठाने म्हटले आहे की, कोणत्याही वैध कारणाशिवाय किंवा गरजेशिवाय राष्ट्रपतींनी निर्णय घेण्यास विलंब करणे हे संविधानाच्या मुलभूत तत्त्वाच्या विरुद्ध असेल. कोणताही अधिकार मनमानीपणे वापरला जाऊ शकत नाही. खंडपीठाने ८ एप्रिल रोजी राखीव ठेवलेला निर्णय जाहीर केला. त्यात म्हटले आहे की, तीन महिन्यांपेक्षा जास्त विलंब झाल्यास संबंधित राज्याला त्याबाबत कळवावे लागेल आणि विलंबाचे कारण द्यावे लागेल. तामिळनाडूचे राज्यपाल रवी यांनी राष्ट्रपतींकडे १० विधेयके पाठवली होती. या कृतीला न्यायालयाने बेकायदेशीर आणि चुकीचे असल्याचे म्हटले. राज्यपालांवर विधेयक मंजूर करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने घातलेली कालमर्यादा हा तर न्यायालयाचा अतिरेक आहे, अशी प्रतिक्रिया केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी दिली आहे. सुप्रीम कोर्टाने राष्ट्रपती व राज्यपालांना विधेयक मंजुरीसाठी निश्चित कालावधी दिला आहे. या निकालाचे पडसाद संपूर्ण देशात उमटत आहेत. जर न्यायालयाने राज्यघटनेत सुधारणा केल्यास संसद व विधानसभेचे काम काय? असा प्रश्न राज्यपाल आर्लेकर यांनी केला. राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी राज्यघटनेत कोणतीही कालमर्यादा नाही. न्यायालयाने ३ महिन्यांची मर्यादा घालणे ही घटनादुरुस्ती केल्यासारखाच प्रकार आहे. दोन न्यायाधीश राज्य घटनेचे स्वरूप बदलू शकत नाहीत. राज्यपालांकडेही कारणे असू शकतात, असे आर्लेकर म्हणाले. केरळच्या राजभवनात कोणतेही विधेयक प्रलंबित नाही. काही विधेयके राष्ट्रपतींकडे पाठवली आहेत. केरळ सरकारने या प्रकरणात सुप्रीम कोर्टात धाव घेतली असून त्याची सुनावणी १३ मे रोजी होणार आहे. केरळ सरकारने सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना त्यांचा खटला न्या. पारडीवाला आणि न्या. महादेवन यांच्या खंडपीठाकडे पाठवण्याची विनंती केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अतिरेकी असल्याचे सांगताना न्यायालय आपल्या मर्यादा ओलांडत असून कार्यकारी आणि कायदेमंडळात हस्तक्षेप करत असल्याचा आरोपही आर्लेकर यांनी केला आहे. न्यायालयाने तीन महिन्यांची मर्यादा घालणे म्हणजे न्यायालयाकडून घटना दुरुस्ती करण्यासारखेच आहे. न्याय व्यवस्थापन वर्षानुवर्षे अनेक खटले प्रलंबित ठेवते. हे लक्षात घेता राज्यपालांकडेही विधेयके प्रलंबित ठेवण्याची कारणे असू शकतात, अशी भूमिका आर्लेकर यांनी मांडली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे तामिळनाडू सरकारने राज्यात १० कायदे लागू केले आहेत. राज्य विधिमंडळाने मंजूर केलेली ही विधेयके शनिवारी राज्य सरकारने अधिकृत राजपत्रात अधिसूचित केली. ज्यामध्ये असे म्हटले आहे की, या कायद्यांना राज्यपाल आर. एन. रवी यांनी मान्यता दिली आहे. तामिळनाडू सरकारचा हा निर्णय देशातील असा पहिलाच प्रकार आहे जिथे राज्य सरकारने राष्ट्रपती किंवा राज्यपालांच्या मान्यतेऐवजी न्यायालयाच्या आदेशाच्या आधारे कायदा लागू केला आहे. गत अनेक दिवसांपासून तामिळनाडूचे राज्यपाल रवी यांनी घटनाबा पद्धतीने विधेयके अडवून ठेवली होती. न्यायालयाने दिलेल्या दणक्यानंतर देशातील विरोधी पक्षातील सरकारमध्ये राज्यपालांची होणारी लुडबूड थांबली जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. राज्यपालांनी संसदीय लोकशाहीच्या स्थापित परंपरांचा आदर करून काम करावे. कायदेमंडळाद्वारे व्यक्त होणा-या जनतेच्या इच्छेचा आदर केला पाहिजे आणि जनतेला जबाबदार असलेल्या निवडून आलेल्या सरकारचाही आदर केला पाहिजे हे आता स्पष्ट झाले आहे. राज्यपालांनी मित्र, तत्त्वज्ञानी आणि मार्गदर्शकाची भूमिका नि:पक्षपातीपणे पार पाडली पाहिजे. राजकीय सोयीच्या विचारांनी नव्हे तर त्यांनी घेतलेल्या संवैधानिक शपथेच्या पावित्र्याने मार्गदर्शन केले पाहिजे. राज्यपालांनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने निर्णय घेणे अभिप्रेत असताना विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये त्यांनी अधिकाराचा गैरवापर केला. या बिगर भाजपशासित राज्यात राज्यपाल पदावरील व्यक्तीच्या माध्यमातून सत्ताधा-यांची अडवणूक करण्याचे प्रयत्न घटनेशी विसंगत आहेत. यात केवळ सत्ताधारी लोकप्रतिनिधींचे अवमूल्यन होते असे नाही तर विरोधकांचेही होते. हे सारे विरोधी पक्षांची सत्ता असलेल्याच राज्यांमध्ये घडत होते. भाजपशासित राज्यांमधील राज्यपालांनी विधेयकांना अशा प्रकारे खोडा घालण्याचे काम केल्याचे प्रकार क्वचितच घडले. न्यायालयाच्या निकालामुळे राष्ट्रपतींच्या अधिकारांचा अधिक्षेप होत असल्याचे केंद्र सरकारला वाटत असेल तर ते त्यावर सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करू शकतात. सध्या केंद्रातील भाजप सरकारने आत्मपरीक्षण करण्याची जास्त गरज आहे.

# जालना जिल्ह्यात शेतकरी अतिवृष्टीचा ५० कोटींचा घोटाळा!

## घोटाळ्यामध्ये ग्रामसेवक शेतकरी तलाठ्याचा समावेश?

**जालना। प्रतिनिधी**

**तहसीलदारांचं लॉगिन वापरुन तलाठी, ग्रामसेवकांनी व तसेच याप्रकरणी शेतकऱ्यांनी सुद्धा खोटी माहिती दिली असल्याची समोर येत आहे. शेतकर्यांचे अतिवृष्टीचे ५० कोटी रुपये हडपल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. राज्य शासनाची झोप उडवणारा हा घोटाळा आहे. उपजिल्हाधिकारी यांना विचारले असता ते म्हणाले चौकशीमध्ये जे निष्पन्न होईल व ज्यांनी घोटाळा केला असेल त्यांच्यावर शासनाच्या नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल अशी माहिती उपजिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त होत आहे, जिल्हाधिकार्यांनी या घोटाळ्याच्या चौकशीसाठी त्रिसदस्यी समिती नेमली होती. या समितीनं हा घोटाळा उघडकीस आणला आहे. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये पीक अनुदानाच्या बाबतीत काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर या तक्रारींची प्राथमिक तपासणीनंतर हे लक्षात आलं की, काही ठिकाणी डुप्लिकेशन झालं आहे**

तसंच काही ठिकाणी बोगस याद्या जोडून अनुदान उचलण्यात आलं आहे. ही तक्रार प्राप्त झाल्यानंतर जानेवारी महिन्यात जिल्हाधिकार्यांनी त्रिसदस्यीय समिती नेमली होती. यामध्ये सहाय्यक जिल्हाधिकारी पुलकित सिंह, तसंच ईजीएस डेप्युटी कलेक्टर मनिष दांडगे आणि नायब तहसिलदार लुणावत मॅडम यांचा समावेश होता. या त्रिसदस्यी समितीनं या घटनेची चौकशी केली साधारण घनसागंवी आणि अंबड तालुक्यातून साधारण ७५ ते ८० गावांमध्ये तलाठ्यांनी अपलोड केलेल्या ज्या याद्या आहेत त्याची प्राथमिक तपासणी समिती करत आहे. यामध्ये प्रत्येक तलाठी, मंडल अधिकारी आणि कृषी सहाय्यक यांना चौकशीसाठी बोलावून त्यांनी ज्या याद्या दिलेल्या होत्या त्यांची फेरतपासणी केली जात आहे. पण याची अंतिम यादी अद्याप समोर आलेली नाही. यामध्ये नेमकी मोडस ऑपरेंडी काय आहे? हे पूर्ण अहवाल समोर आल्यानंतरच कळू शकेल. पण यामध्ये दोन शक्यता असू शकतात. एक म्हणजे यात दुबार लाभार्थी असू शकतात, एकाच नावाच्या व्यक्तीनं दोनदा फायदा घेतलेला असू शकतो. किंवा काही कागदपत्रे आहेत त्यामध्ये छेडछाड केलेली असू शकते. जालन्यात २०२२-२३ मध्ये अतिवृष्टी झाली. यावेळी शेतकर्यांची नुकसान भरपाई मंजूर केली होती. या नुकसान भरपाईत काही तलाठी, ग्रामसेवकांनी हात साफ केला आहे. प्रशासनानं यामध्ये घोटाळ्याचा नेमका आकडा सांगितलेला नाही पण हा आकडा ५० कोटी रुपये असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात डॉ.आंबेडकर जयंती साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील परभणी (के) येथील सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात महामानव बोधिसत्व परमपूज्य विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती १३४ व्या जयंती निमित्त त्यांच्या पावन प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले .सदरील कार्यकमासाठी संस्थेचे मा.अध्यक्ष ,सचिव पदाधिकारी ,गावातील मा.सरपंच ,उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य ,तसेच गावातील भीम जयंती उत्सव मंडळ अध्यक्ष सदस्य सर्व प्रतिष्ठीत नागरिक ,शिक्षण कोटी कोटी प्रणाम. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदरील कार्यकमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.तांदळे आर.आर. हे होते .तर गावातील प्रतिष्ठीत नागरिक .पालक,माजी विध्यार्थी मंडळ आदि सर्व उपस्थित होते.सदरील कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन प्रतिमेचे पुजन हार ,पुष्प अर्पण करूण विनम्र अभिवादन्? करण्यात आले भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न विश्वरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती निमित्त, कोटी कोटी प्रणाम तसेच विद्ययालयतिल्? सर्वे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी श्री कुटे सर,श्री. शिन्दे स्र्? श्रीमती.वडमारे मॅडम,जोगदंड श्रीमती .बडे मॅडम, श्री. उजगरे सर ,श्री .जोगदंड सर,श्री. तारळकर सर. आदी सर्व कर्मचारी उपस्थित होते.



# श्रीनिवास कन्सट्रक्शन कडून शेतकऱ्याचे नुकसान

**जालना । प्रतिनिधी**

जालना येथील श्री शिंदे यांचे श्रीनिवास कन्सट्रक्शन या एजन्सी मार्फत घनसावंगी तालुक्यातील गुरुपिंपरी ते शिंदे वडगाव या रस्त्यावर काम करण्यात आले होते परंतु हे काम करताना शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आली. रस्त्यामुळे आमच्या शेतातील पिकांचे नुकसान झाल्याने संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावे तसेच एजन्सीवर कारवाई करावी या दोघांमुळे आमच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आल्याने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी रेखा शहाणे व शिवदास शहाणे (रा. अंबड) यांनी लोकशाही दिनात केली असून, सामान्य प्रशासन उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी एका महिन्यात कार्यवाही करुन अंतिम अहवाल अर्जदार व जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, असे आदेश कार्यकारी अभियंत्याला दिले आहेत. यासंदर्भात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता आणि महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेला दिलेल्या पत्रात उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी म्हटले आहे की, अर्जदार शहाणे दाम्पत्याने लोकशाही दिनात दिलेल्या अर्जानुसार गुरुपिंपरी (ता. घनसावंगी) येथील गट नं. ५३ मधील क्षेत्र ८० आर जमीन ही रेखा शिवदास शहाणे यांच्या नावे तर गट नं. ५७ मधील क्षेत्र ६० आर जमीन शिवदास दामोधर शहाणे यांच्या नावे आहे. सदर जमीनीजवळून गुरुपिंपरी ते शिंदे वडगाव हा रस्ता गेला असून, सदर रस्ता श्रीनिवास कन्सट्रक्शन कंपनीने तयार केला आहे. त्या रस्त्यामुळे पावसाचे पाणी शेतात येवून पिकांचे नुकसान झाले असून, पावसाचे पाणी येवू नये म्हणून आम्ही आणलेला मुरुम व सिमेंट पाईप गायब करण्यात आले आहेत. आमच्यावर विविध बँकांचे कर्ज असून, त्यातच रस्त्याचे काम झाल्याने असलेल्या नुकसानीमुळे आमच्यावर आत्महत्येची वेळ आली आहे, असे शहाणे दाम्पत्याने अर्जात म्हटले असून, त्यांच्या तक्रारीबाबत एका महिन्यात अंतिम कार्यवाही करून अहवाल अर्जदारासह या कार्यालयास सादर करावा, असे निर्देश उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी दिले आहेत.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता ज्योत रॅली उत्साहात

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती च्या पूर्वसंध्येला शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी व पोलीस प्रशासन माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य समता रॅली चे आयोजन करण्यात आले होते ही समता रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहचली व तेथे ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन जुना मोंढा रोड या मार्गाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक भीम नगर माजलगाव येथे ठीक १२ वाजता बुद्ध वंदनेने रॅलीची सांगता झाली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धकृती स्मारकास पुष्पहार अर्पण करून उपजिल्हाधिकारी मा.गौरव इंगोले माजलगाव शहर पोलिस निरीक्षक मा.राहुल सूर्यतळ, माजलगाव ग्रामीण पोलीस अधीक्षक मा.बालक कोळी यांनी व तमाम जनसमुदायांनी अभिवादन केले.**



या समता ज्योत रॅली मध्ये उपजिल्हाधिकारी मा.गौरव इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती माजलगाव शहर पोलीस अधीक्षक मा.राहुल सूर्यतळ माजलगाव ग्रामीण पोलीस अधीक्षक मा.बालक कोळी व सर्व पोलीस प्रशासन तसेच माजलगाव येथील सर्वपक्ष संघटनेचे पदाधिकारी व्यापारी व शिव-शाहू-फुले-आंबेडकरी युवकांची युवतींची व विशेष महिलांची उपस्थिती होती. हि रॅली यशस्वी करण्यासाठी माजलगाव शहरातील शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी यांनी परिश्रम घेतले.

# मंथन परिक्षेत सवासेवाडी शाळेचे पाच विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**वडवणी । प्रतिनिधी**

**मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा परिक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सवासेवाडी शाळेचा अथर्व नागरगोजे राज्य गुणवत्ता यादीत तर तनिष्क बडे विभागीय गुणवत्ता यादीत अव्वलस्थानी आले असून या परिक्षेत सवासेवाडी शाळेचे पाच विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले आहेत. यावरुन परत एकदा चिंचवण केंद्राची उत्तुंग भरारी कौतुकास्पद असल्याचे दिसून येते.**

मंथन सामान्य ज्ञान स्पर्धा परिक्षा २०२५ जानेवारीमध्ये महाराणी ताराबाई माध्यमिक विद्यालय वडवणी येथे घेण्यात आलेल्या परिक्षेत चिंचवण केंद्रातील सवासेवाडी शाळेतील विद्यार्थी या परिक्षेला बसले होते. त्या परिक्षेत या शाळेतील इयत्ता चौथीच्या वर्गातील चि.अथर्व बंडू नागरगोजे याने ३०० पैकी २९२ गुण मिळवून राज्य गुणवत्ता यादीत पाचवा क्रमांक मिळवला आहे. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोन्नाखोटा शाळेतील चौथीचीच विद्यार्थीनी कु.तनिष्का उध्दव बडे हिने या परिक्षेत ३०० पैकी २९० गुण मिळवून विभागीय गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सवासेवाडी शाळेतीलच इयत्ता पहिलीचा विद्यार्थी चि.महेश लक्ष्मण वडणे याने केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक मिळवला आहे. इयत्ता तिसरीमध्ये कु.संस्कृती रमेश सवासे हिने केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक मिळवला असून याच वर्गातील चि.विराट गणेश मुंडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला आहे. इयत्ता चौथीमध्ये कु.प्रणाली ईश्वर सवासे हिने केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत सातवा क्रमांक प्राप्त केला आहे. तर इयत्ता पहिलीच्या वर्गातील विद्यार्थिनी कु.आराध्या नागरगोजे हिने केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत चौथा क्रमांक प्राप्त केला आहे. अशाप्रकारे दैदिप्यमान यश या परिक्षेत मिळवल्याने संपूर्ण वडवणी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात चिंचवण केंद्राने परत एकदा उत्तुंग भरारी घेत कौतुकास पात्र ठरले आहेत. दरम्यान मंथन परिक्षेत मिळवलेल्या घवघवीत यशाबध्दल सर्व विद्यार्थ्यांचे वडवणी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख तथा केंद्रिय मुख्याध्यापक सुनिल मुंडे, सोन्नाखोटा शाळेचे मुख्याध्यापक ए.आर.मुंडे सवासेवाडी शाळेचे मुख्याध्यापक पवन आरसेवार व सहशिक्षक बंडू नागरगोजे, उध्दव बडे, गोरक्षनाथ मुंडे, विष्णू आंधळे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



**अंबड : येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती अंबड येथे उत्सवात साजरी करण्यात आली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ ढाकणे , बागुल हॉस्पिटलचे संचालक त्वचारोग तज्ञ डॉ. राहुल बागुल, आई हॉस्पिटलचे संचालक डॉ शालिकराम धायकर, होमगार्ड कर्मचारी राजू शिंदे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.**

## पान १ वरून...

### देशात यंदा सरासरीपेक्षा

ओलांडेल, असा अंदाज आहे. मान्सून वेळेवर सुरू होईल म्हणजेच जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून केरळमध्ये पोहोचणार आहे, असाही हवामान विभागाचा अंदाज आहे.

--------

### पत्नी बरोबर अनैतिक संबंध

स्वामी समर्थ केंद्राच्या बाजूला असलेल्या रस्त्यावर फपाळ याने बाबासाहेब आगे यास गाठले. त्यानंतर काही कळायच्या आत नारायण फपाळ याने आगे याच्यावर कोयत्याने सपासप वार केले.फपाळ याने आगोदर मयत बाबासाहेब आगे याच्या पोटात वारकरून नंतर दोन वार डोक्यात केले. त्यानंतर फपाळ तेथून पसार झाला. नागरिकांनी माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनेस्थळी धाव घेतली.पाहणी करून घटनास्थळाचा पंचनामा करत पोलिसांनी बाबासाहेब आगे यास गंभीर जखमी अवस्थेत ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. येथे तपासून डॉक्टरांनी आगे याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.मयत बाबासाहेब आगे याच्या शवविच्छेदन नंतर किट्टी आडगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

**पत्नी बरोबर अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरूनच हल्ला**

दरम्यान, हल्ला केल्यानंतर आरोपी नारायण शंकर फपाळ पोलिस ठाण्यात शरण आला. त्याने आगे याचा खून मागील १० वर्षांपासून आरोपीच्या पत्नी बरोबर अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरूनच मयत बाबासाहेब आगे याच्यावर आरोपीने कोयत्याने वार करुन खुन केला आहे.भर दिवसा रस्त्यावर हत्येच्या थरारक घटनेने माजलगाव शहर हादरले आहे.

**आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल**

यासंदर्भात पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार मयताचा मेहुणा बबन घाटुळ यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत असे म्हटले आहे की,आरोपी नारायण शंकर फपाळ याने दि १५ एप्रिल मंगळवार रोजी दुपारी २:०० वाजता आरोपी नारायण फपाळ याने त्याच्या पत्नीसोबत मागील १० वर्षांपासून अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून भाजपा कार्यालया जवळील शर्मा यांच्या दुकानाच्या शटर जवळ मयत बाबासाहेब प्रभाकर आगे (वय ३३ वर्ष ) याच्यावर धारदार सतुराने वार करुन जिवे ठार मारल्याच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गु.रं.नं.१४८/२०२५,कलम भारतीय न्याय संहिता १०३(१),भारतीय हात्यार कायदा सह कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सतीष दिंडे हे करत आहेत.

------------

### शासनाच्या या लाडक्या बहिणींना

बहीण योजनेअंतर्गत १५०० रुपये दरमहा सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे. तसेच, इतर शासकीय योजनांचा १५०० रुपयांपेक्षा कमी लाभ घेणाऱ्या महिलांना उर्वरित फरकाची रक्कम सन्मान निधी म्हणून वितरित करण्यात येत आहे. त्याच शासन निर्णयाला अनुसरून नमो शेतकरी सन्मान योजनेचा दरमहा १००० रुपये लाभ घेत असलेल्या ७७४१४८ महिलांना उर्वरित फरकाचे ५०० रुपये सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे. एकाही पात्र भगिनीस या योजनेतून वगळण्यात आले नसून, सदर प्रक्रियेत दिनांक ३ जुलै २०२४ नंतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही. याबाबतचे स्पष्टीकरण मी स्वतः विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले असून विधिमंडळाच्या कामकाजात त्याची नोंद आहे. तरीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत सातत्याने अपप्रचार करणाऱ्या विरोधकांचे एकतर प्रशासकीय आकलन कच्चे आहे, किंवा योजनेच्या देदीप्यमान यशाने त्यांचे मनोबल खचले आहे. विरोधकांच्या या अपप्रचाराला माझ्या लाडक्या बहिणी बळी पडणार नाहीत ही मला खात्री आहे.

-------------

### एसटी कर्मचाऱ्यांचे थकलेले

निधी प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत ४४ टक्के वेतन आज वितरीत करण्यात आले आहे. राज्याचे वित्त सचिव ओमप्रकाश गुप्ता यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसोबत झालेल्या चर्चेनंतर मंगळवापर्यंत उर्वरित वेतन येईल असे सांगितले होते. त्यानुसार मंगळवारी सर्व एसटी कर्मचारी व अधिकाऱ्यांचे उर्वरित वेतन बँक खात्यावर जमा झाले आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या मार्चच्या महिन्यात ४४ टक्के कपात करण्यात आली होती. दिवसरात्र एसटी प्रवाशांना सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात करण्यात आल्याने संताप व्यक्त करण्यात आला होता. एसटी महामंडळाला यंदा मागणीच्या तुलनेत अर्धा निधी देण्यात आला होता. एसटीतील ८७ हजार कर्मचाऱ्यांना वेतन व एलआयसीसाठी महिन्याला ४६६ कोटी लागतात. पण राज्य सरकारने केवळ ३०५ कोटी २९ लाख रुपये दिले. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मार्चच्या वेतनात ४४ टक्के कपात करण्यात आली होती.

----------------------------

### नेकनूरमध्ये पित्याकडूनच

मुलीवर अत्याचार केला. मुलीची आई पुण्यावरून परत आल्यानंतर सदरील प्रकार उघडकीस आला. त्यानंतर, पीडितेच्या आईने याबाबत नेकनूर पोलीस ठाण्यात धाव घेत नराधम पित्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, आईच्या तक्रारीवरुन आरोपीविरोधात बाल लैंगिक अत्याचार विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सध्या नराधाम आरोपी नेकनूर पोलिसांच्या ताब्यात असून या घटनेमुळे नेकनूर परिसरात खळबळ उडाली आहे.

------------

### मंत्री उदय सामंत यांचा बीड

संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या बैठकीनंतर दुपारी १२ वाजता मंत्री सामंत पत्रकार परिषद घेत बीड जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीसंदर्भातील आपली मते मांडतील. त्यानंतर ते संभाजीनगर मार्गे मुंबईकडे रवाना होणार आहेत. जिल्ह्यातील स्थानिक उद्योगपती, व्यापारी संघटना व प्रशासन यांच्यात या दौऱ्याबाबत उत्सुकता आहे. जिल्हा गुंतवणूक परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन माजी जिल्हाप्रमुख अनिल जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. १६ एप्रिल २०२५



## आज जिल्हा गुंतवणूक परिषद उद्योगमंत्री उदय सामंत यांची उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली उद्या जिल्हा गुंतवणूक परिषद होत आहे. ही परिषद येथील ग्रँड यशोदा हॉटेल, बार्शी नाका येथे सकाळी १०.०० वाजता याचे उद्घाटन होईल.



महाराष्ट्रातील जिल्हयांना सक्षम बनविणे आणि गुंतवणूक आकर्षित करण्यास चालना मिळावी यासाठी राज्यातील सर्व जिल्हयात उद्योग संचलनालय आणि जिल्हा उद्योग केंद्रामार्फत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. उद्या होणा-या या परिषदेस विकास आयुक्त (उद्योग), अध्यक्ष मैत्री दिपेंद्रसिंह कुशवाह तसेच जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यात उद्योजक तसेच इतरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सहसंचालक बी.टी. यशवंते आणि जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव यांनी केले आहे.

# एखाद्याने शिकून किती मोठं व्हावं हे संविधान निर्माते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांकडून शिकले पाहिजे - डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**सामाजिक विषमतेमुळे झालेले अन्याय सहन करून त्यापासून प्रेरणा घेवून एखाद्याने शिकून ज्ञानी व्हावं केवळ ज्ञानीच नाही तर या जगावर आपल्या बुद्धिमत्तेने राज्य करावं ,स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहावी आणि परदेशी विद्यापीठांमध्ये त्यांच्या नावाचे पुतळे उभे केले जावे आणि त्या पुतळ्याखाली सिम्बॉल ऑफ नॉलेज अर्थात ज्ञानाचे प्रतीक असे लिहिले जावे. एवढे मोठे माणसाला होते आले पाहिजे त्याकरिता जीवनभर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श समाजातील प्रत्येक व्यक्तीने घेणे गरजेचे आहे असे मत अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.**

महात्मा फुले स्मारक नगर येथे प्रथमच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या थाटामाटात आणि जल्लोषात व वैचारिक प्रबोधन करून साजरी केली गेली त्यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा.मधुकरराव इंगोले, बी.एल.ओव्हाळ, बी.के.मसने, पीएसआय जाधव, शासकीय महाविद्यालयाच्या विभागप्रमुख प्रा.डॉ.विद्या इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मधुकरराव इंगोले व बी.एल.ओव्हाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करून तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. पुढे



बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनप्रवास उलगडून दाखवत असताना महापुरुषांचे विचार व त्या विचारांचे वारसदार यांनी समाजामध्ये कशा पद्धतीने जगले पाहिजे आणि आपल्या सोबत इतर समाजही कसा प्रगल्भ ज्ञानी आणि समृद्ध केला पाहिजे याविषयी विवेचन केले. क्रांती आणि प्रतिक्रांती या एकाच गतीने एकाच वेळी एकाच दिशेने मार्गक्रमण करत असतात त्यामुळे क्रांतीचा विचार ज्यांनी हृदयामध्ये तेवत ठेवलेला आहे त्यांनी या गोष्टीचा विचार करून समाजप्रबोधनाकडे विशेषत्वाने लक्ष दिले पाहिजे अन्यथा प्रतिक्रांती ही क्रांतीचे विचार आणि प्रगल्भता याला झाकून ठेवण्याचे काम करते असे प्रतिपादन डॉ.राजेश इंगोले यांनी केले. यावेळी बोलताना बी.एल.ओहाळ यांनी माळीनगर येथील महात्मा फुले स्मारक ही संकल्पना प्रा.मधुकरराव इंगोले यांची होती आणि त्यांनी त्यासाठी इथे स्मारकाची जागा राखून ठेवली ही आठवण सांगितले आणि हे स्मारक होण्यासाठी आता येथील नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली पुरोगामी चळवळीतला कार्यकर्ता हा सदैव सजग आणि सावध असला पाहिजे कारण बदलती सामाजिक परिस्थिती अशा कार्यकर्त्यांना अधिक जबाबदारीने कार्य करण्याची संधी देते असे मत ओव्हाळ यांनी व्यक्त केले. प्रा.डॉ.विद्या इंगोले यांनी बहुजनांना गावकुसाबाहेर बसवली जात होते सामाजिक प्रवाहामध्ये येण्याची त्यांना कुठली ही संधी नव्हती क्षैक्षणिक सांस्कृतिक व सामाजिक अभिसरण प्रक्रियेत बहुजनांना कुठलीही स्थान नव्हते ते स्थान प्राप्त करून देण्याचे महान कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांसाठी केले हे उपकार बहुजन समाजाने विसरले नाही पाहिजे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अनिल नरसिंगे व सूत्रसंचालन किरण चक्रे यांनी केले. तर अध्यक्षीय समारोप रत्नदीप गोरे यांनी केला. तर उपस्थितांचे आभार ढगे सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुनिल नरसिंगे, संजय साळवे, विजय कचरे, आदित्य कदम यांच्यासह परिसरातील नागरिकांनी परिश्रम घेतले.

## जय भवानी महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

**पाटोदा । प्रतिनिधी**

येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय सांस्कृतिक विभाग राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या जयंतीनिमित्त महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले यात सांस्कृतिक विभागाच्या वतीने वकृत्व स्पर्धा निबंध स्पर्धा भीम गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आल या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला तर विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन व १८ तास पुस्तक वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले तर राष्ट्रीय सेवा योजना



विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले या व्याख्यानाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक विनोद किर्दक सर उपस्थित होते त्यांनी बाबासाहेबांच्या शैक्षणिक विचाराचा मागवा घेतला विविध कार्यक्रमाने महाविद्यालयात ही जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यासाठी महाविद्यालयाची प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर सांस्कृतिक विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक बापू गोक्षे डॉ रामकृष्ण प्रधान प्राध्यापक डॉ प्रवीण शिलेदार विद्यार्थी कल्याण विभागाचे डॉक्टर लोखंडे बीबी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्राध्यापक शिवाजीराव काकडे सर ग्रंथपाल रकटे मॅडम यांनी विविध स्पर्धांचे आयोजन करून ही जयंती व साजरी करण्यात आली या जयंतीसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन ज्ञानाचे प्रतिक, विश्वरत्न,बोधीसत्व, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती दि १४ एप्रिल सोमवार रोजी मोठ्या उत्साहात विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली.

भारतीय बौद्ध महासभेने दि १३ एप्रिल रोजी संपुर्ण देशभर बोधीसत्व धम्मज्ञान परिक्षा घेण्यात आल्या. त्यानुसार माजलगाव तालुक्यातुन सांची बुद्ध विहार,डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत, यशोधरा बुद्ध विहार माजलगाव,वैशाली बुद्ध विहार केसापुरी,बुद्ध विहार फुले पिंपळगाव या एकुण ४ परिक्षा केंद्रावर वेग- वेगळया गटातुन एकुण १३८ परिक्षार्थीनी परिक्षा दिली त्यानंतर दि १४ एप्रिल सोमवार रोजी सकाळी ठिक ९:९९



वाजता पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ.भागवत साळवे यांच्या हस्ते करण्यात आले. नंतर लगेचच धम्म वंदना होऊन मान्यवरांचे मार्गदर्शन झाले या मध्ये प्रामुख्याने भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संस्कार उपाध्यक्ष.एस बी मोरे,जिल्हा महिला संस्कार उपाध्यक्षा लिलाताई उजगरे,जिल्हा संस्कार सचिव एन. बी.राजभोज यांची मार्गदर्शन पर मनोगते झाली या कार्यक्रमास भारतीय बोद्ध महासभेच्या महिला संस्कार सचिव आशाताई मोरे, जिल्हा संघटक बी. सी.डोंगरे,महिला शहर अध्यक्षा वंदानाताई घनघाव, एस.एस. गायसमुद्रे,दौलत कणकुटे,सह धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्तीत होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तर प्रस्ताविक गुलाब धाईजे यांनी केले व सुत्रसंचलन सिद्धार्थ वक्ते यांनी केले या कार्यक्रमाची आभार प्रदर्शन डी. पी.वाघमारे यांनी केले.या कार्यक्रमाची सांगता शरनतय घेऊन करण्यात आली.

## माजलगाव वकील संघात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

विश्ववंदनीय,परमपूज्य,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, युगप्रवर्तक,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दि १४ एप्रिल सोमवार रोजी मोठ्या उत्साहात माजलगाव येथील वकील संघात करण्यात आली.प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती वकील संघातील सर्व सदस्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



या जयंती उत्सवाच्या सुरुवातीस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस व अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.त्यानंतर वकील संघातील सदस्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी व त्यांच्या महान कार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले.यामध्ये ॲड.एस.सी.शर्मा,ॲड.सुजित कांबळे,ॲड.दिपक देशमुख,ॲड.बलराज शिंदे,ॲड.आर.यु.फपाळ यांनी मनोगत व्यक्त केले, तर ॲड. बाबुलाल घनघाव आणि ॲड.उजगरे (जाधव ) मॅडम यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर गीत गायन केले.या जयंती उत्सव कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप माजलगाव वकील संघाचे अध्यक्ष ॲड.बी.आर.डक यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन माजलगाव वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड.एस.एस.कसबे यांनी केले.

या जयंती कार्यक्रमास वकील संघातील सदस्य ॲड.एस.के.गोंडे (नाना ),ॲड.बी.जे.खरात,ॲड. बाळासाहेब उर्फ बाळकृष्ण तेरकर,ॲड.सुधाकर गरड,ॲड. सचिन राऊत,ॲड .निळकंठ नायकोडे,ॲड.भागवत हिंगण, ॲड.विजय मस्के,ॲड.कैलास डोंगरे,ॲड.चेतन सातपुते,ॲड. एच.एस.बडे,ॲड.राहुल बजाज यांच्या सह इतर सदस्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली व कार्यक्रम यशस्वी पार पाडला.





## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती पाटोद्यात मोठ्या उत्साहात साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १४७वी जयंती पाटोदा तालुक्यात मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. सार्वजनिक भीमजयंती उत्सव समिती पाटोदा यांच्या वतीने भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.ही मिरवणूक भीमनगर येथून सुरू होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात विसर्जित झाली. मिरवणुकीत हजारोंच्या संख्येने भीमसैनिकांनी सहभाग घेतला. ढोल-ताशा, बँड पथक आणि भीमगीतांच्या गजरात वातावरण भारावून गेले होते.या मिरवणुकीचे विशेष आकर्षण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सजवलेली प्रतिमा, फुलांनी सजवलेली वाहने आणि बँड पथकाचे मधुर वादन. मिरवणुकीदरम्यान सर्व धर्मीय नागरिकांनीही सहभाग घेत, सामाजिक एकतेचा संदेश दिला.कार्यक्रमाची सांगता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात अभिवादन करून करण्यात आले.



### जाहीर प्रगटन

ज्याअर्थी मौजे पिठोरीसिरसगांव गट नं. २२९ मधील म.ज.म.अ.१९६६ चे कलम १५५ नुसार अर्जदार श्री गयाबाई सायन्ना पवार व इतर रा. गोंदी तांडा यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार, तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ०८.०८.२०२४, दिनांक ०२.०१.२०२५. दिनांक ०६.०३.२०२५ व दिनांक २०.०३.२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात अली होती. तथापी खालील प्रमाणे गैरअर्जदार सदर सुनावणीसाठी हजर राहत नाहीत.

प्रतिवादीः-१. बाबु तुकाराम शिंदे

रा. गोंदी ता. अंबड जि. जालना

वरिल प्रमाणे गैरअर्जदार सुनावणीसाठी गैरहजर आहेत. मोजे पिठोरीसिरसगांव गट नं.२२९ मधील म.ज.म.अ.१९६६ चे कलम १५५ निर्णय पारित करणे आवश्यक आहे. सबब या द्वारे आपणास जाहीर नोटीस देवुन कळविण्यात येते की, आपण ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखेपासुन ०७ दिवसाचे आत अथवा पुढील सुनावणी दिनांक १७.०४.२०२५ रोजी दु.२.०० वाजता आपले म्हणणे तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात पुराव्यासह समक्ष दाखल करावेत. आपण मुदतीमध्ये किंवा व्यक्तीशः हजर राहुन आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यानुसार उपलब्ध अभिलेखे तपासुन गुणवत्तेनुसार सदर प्रकरणात निर्णय आदेश पारित करण्यात येईल. दिनांक-२४/०३/२०२५

**स्वाक्षरीत/-**

**कार्यालय तहसीलदार अंबड**


पान ६ वरून...

### क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा

शक्य नसते. या गोष्टीचा विचार करुन स्वाराती रुग्णालयात रक्तदान शिबीर घेण्यात आले.सामीजिक बांधिलकी जोपासण्यासाठी व समीजातील गोर गरीब जनतेला आपण केलेल्या रक्तदानाचा लाभ घेता यावा यासाठी या शिबीराचे आयोजन केले होते. मोरया उद्योग समुह नेहमीच समाजकार्यात आग्रेसर असतो. त्याच एक भाग म्हणुन रक्तदान शिबीर होते. या शिबीरात मोरया उद्योग समुह अंबाजोगाईचे अध्यक्ष श्रीकांत धायगुडे, प्रशांत काळदाते, कृष्णा मसने, किशोर बलुतकर, अभी काळे, अविनाश साखरे, किरण साळुंके, सिध्द सिरसट, नरेश सोमवंशी, गोविंद जाधव, वैभव संगवे, सुरज पोटभरे, रवि मस्के, बालाजी मस्के, जगदिश थोरात, रोशन कातळे, शैलेश चौरे, शुभम धायगुडे, बळीराम मसने, मनोज पवार, अभी शेंद्रे, वैभव मसने आदीनी रक्तदान करुन सहकार्य केले.

### अनाथांना सांभाळण्याचे काम

काळे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

किर्तन सांगताना ह.भ.प. संजय महाराज म्हणाले कि, मृत्यु हा सर्वांना अटळ आहे, सत्ता, संपत्ती येथे काही चालत नाही हा मृत्यु लोकांचा नियम आहे. हा नियम सांगणार्यांनी आणि ऐकनार्यांनी पण समजून घेतला पाहिजे. ज्याचे मरण निष्ठीत असेल त्याने सावध राहिले पाहिजे. संत किर्तन सांगतात परंतु ऐकणार्यांनी किर्तन समजून घेतले पाहिजे. फार मोठं घर आहे, संपत्ती आहे ते घर चांगले आहे असे नाही ज्या घरात आदरातिथ्य आहे, ते घर चांगले आहे. गरीबांना सहकार्य केले जाते तिथे श्रीमंतांची किंमत आहे. ज्या घरी आपला आदर होतो त्या ठिकाणी आपण गेले पाहिजे. जन्माचा जोडीदार जातो तेव्हा आपल्या मनातल्या गोष्टी कोणाला सांगायच्या असा प्रश्न पडतो. म्हतारपणी घरामध्ये सांभाळणारे माणसे असायला पाहिजे. आई-वडिलांची सेवा करा तुम्हाला काशीला जाण्याची गरज नाही. मन है चंगा तो काटवट में गंगा प्रत्येकाची आवड भिन्न भिन्न असू शकते. प्रत्येक साधने माणूस सुखासाठी करतो, धर्मसत्तेला राजसत्तेची जोड असली पाहिजे असे त्यांनी सांगितले. यावेळी महिला पुरूषांची उपस्थिती होती.

### सौताडाची माध्यमिक शाळा

कळल्यानंतर त्यांनी केंद्रप्रमुख गाडे यांना याचा पंचनामा करण्यासाठी शाळेत पाठवले. गाडे यांनी पंचनामा केल्यानंतर हा पंचनामा संबंधित विभागाला पाठवला असून आता यावर काय कारवाई होते ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.शाळेत शिक्षक नाही हे लक्षात आल्यानंतर ग्रामस्थांनी केंद्रप्रमुखांच्या उपस्थितीत प्रार्थना घेतली. प्रार्थना झाल्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या मोजण्यात आली यावेळी २७६ विद्यार्थी उपस्थित होते. मात्र शिक्षक हळूहळू साडेआठ पर्यंत आले शिक्षण विभागाचा आदेश असतानाही परस्पर शाळेची वेळ बदलणे याचे अधिकार मुख्याध्यापकांना आहेत काय ?असा प्रश्न या निमित्ताने पडत आहे. आता उशिरा येणाऱ्या शाळेतील शिक्षकांवर काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या शाळेत विद्यार्थी संख्या मोठी असल्याने जवळपास १४ शिक्षक या शाळेत काम करतात .शाळेचा दर्जा राखण्याची जबाबदारी शाळेतील शिक्षकांची असून त्यांनी वेळ पाळली तर शाळेचा दर्जा चांगला राहू शकतो .येथील पालकही शिक्षणाच्या बाबतीत अग्रेसिव्ह असून शाळेकडे सर्वांचे लक्ष असते. त्यामुळे तात्काळ शालेय समितीचे अध्यक्ष सानप व इतरांनी संबंधित विभागाकडे तक्रार केल्यानंतर या भागाचे आमदार सुरेश धस यांच्याकडेही याची तक्रार करण्यात आली. आता यावर शिक्षण विभाग काय भूमिका घेतो. याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पान ६ वरून...

### राजकिशोर मोदी मित्र

दरम्यान भीमाचा जयघोष करतांना आढळून आले. अंबाजोगाई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एक भव्य असे व्यासपीठ तयार करून याच व्यासपीठावर जयंती उत्सव समित्यांच्या अध्यक्षांचा सन्मान सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. बाबासाहेबांच्या जीवनाचे अनेक पैलू यावेळी लहान विद्यार्थ्यांसोबतच मोठ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उलगडले. या चिमुकल्या व्यक्त्यांचे विचार ऐकून व्यासपीठावरील अनेक दिग्गज अवाक झाले.

सामाजिक सलोखा , सर्वधर्म समभाव तसेच सामाजिक उत्तरदायित्व जोपासत भीम अनुयायांना थंड पाणी व थंड शरबत पुरवण्याची संकल्पना राजकिशोर मोदी मित्र मंडळाचे सहकारी तसेच माजी नगरसेवक महादेव आदमाणे यांनी मांडली व या संकल्पनेस तात्काळ संमती सर्वांनी दिली. बाबासाहेबांच्या मिरवणुकी दरम्यान मंडळाच्या सर्व कला पथकातिल कलाकारांची कला पाहण्यासाठी तयार करण्यात आलेल्या व्यासपीठावर राजकिशोर मोदी यांच्यासह मनोज लखेरा, महादेव आदमाणे, डॉ राजेश इंगोले,अमोल लोमटे, राजेंद्र मोरे, दिनेश भराडीया, सुधाकर टेकाळे, माणिक वडवनकर , जावेद गवळी,सुनील वाघाळकर, अकबर पठाण, अंकुश हेडे, विजय रापतवार, कैलास कांबळे, शाकेर काझी, खलील जाफरी, महेश कदम, सय्येद अमजद, रफीक गवळी, आकाश कऱ्हाड, अजीम जरगर, विशाल पोटभरे,सुमित आदमाणे, सुमित सुरवसे, सचिन गालफाडे, अस्लम शेख, सुशील जोशी, मुन्ना पठाण, तौसिफ सिद्दीकी, रोहन कुरे, शुभम लखेरा यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

### पाणि बचतीची सुरूवात

जलसाक्षरतेसाठी विविध उपक्रम राबवून जल व्यवस्थापनावर अधिक भर दिला जाणार आहे.तसेच विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.सिंचन व्यवस्था,कालवे दुरुस्ती, कालव्यातून होणारी गळती रोखण्यासाठी जलव्यवस्थापन कृती पंधरवडा मध्ये कालव्यांची स्वच्छता करण्यात येणार आहे.यासाठी स्थानिक प्रशासन आणि नागरिकांच्या सहभाग नोंदविण्याचे आवाहन त्यांनी केले.

जलदुत प्रा.राम बोडखे म्हणाले,जर आत्ता आपण जर व्यवास्थापन आत्ता करावे लागेल आपण आत्ता पाणि बचत केली नाही तर पुढचे युध्द हे पाण्यासाठी करावे लागणार आहे.त्यामुळे प्रत्येक नागरीक,शेतक-यांनी पाणी बचतीसाठी पुढील पंधरा दिवस करावे असे आवाहन त्यांनी केले.यावेळी उपस्थित अधिकारी,शेतकरी यांना जलप्रतिज्ञा ची शपथ दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बबन झगडे यांनी करून आभार मानले.

### ज्याचं जळतंय

पगार होऊ शकले नाहीत.याउपर विविध धार्मिक सणाच्या निमित्त मात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन महिन्याच्या अगोदरच होतात.हे तरी आनंदाचे आहे.दरवर्षी मार्च एंड व इतर कारणे देऊन जयंती निमित्त पगार दिला जात नाही.यामुळे बहुजन समाजाची नेहमीच घोरनिराषा होते. प्रशासनातील काही अधिकारी व कर्मचारी हे जातीयवादी दृष्टिकोनातून वेतनाकडे पाहतात की काय असं समज आंबेडकरवादी कर्मचाऱ्यांचा होत आहे.त्याचे कारण मार्च एंड असताना जयंतीनिमित्त पगार करायचा नाही मात्र इतर हेडचे बिलं, गुत्तेदारांची तसेच इतरांची बिलं काढण्यात हे अधिकारी कर्मचारी गुंग असतात.कारण त्यांना त्यातून मिळकत प्राप्त होत असेल.आणि त्यामुळेच ते जिल्हा परिषद शिक्षक कर्मचाऱ्यांची सर्व वेतन देयके बाजूला ठेवतात.असंच सर्वांना वाटतं.अगोदरच अशैक्षणिक कामांच्या बोजामुळे व सावकारी,बँकांच्या कर्जबाजारीपणामुळे,आर्थिक सामाजिक पत ढासळल्यामुळे जिल्हा परिषदेत काम करणारा शिक्षक पूर्णतः वैतागून गेला आहे.

त्यामुळे प्रशासन इतर विभागात ज्या पद्धतीने अशैक्षणिक कामासाठी जिल्हा परिषद शिक्षकांचा वापर करते, त्याचप्रमाणे त्यांचे स्वतःचे वेतन दरमहा वेळेवर होण्यासाठी सुद्धा त्यांनाच प्रतिनियुक्त करावे व अशा कामचुकार अधिकारी कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशा आशयाची मागणी प्रसिद्धी पत्रकांन्वे महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे जि.संघटन प्रमुख भारतभाऊ टाकणखार,ता.सचिव अभिमन्यू इबिते,जि.उपाध्यक्ष वसंत टाकणखार,रवी आदमाने,राहुल खुणे,शिवाजी भाळशंकर,किरण शिंदे,निलेश गावडे,अमोल राऊत,नितीन पुटवाड,मतीन शेख,गोरख उघडे,गोविंद पवार,सय्यद आयुब,हनुमंत पांढरपोटे,नारायण भाळशंकर,राजेंद्र सातपुते,प्रवीण जाधव,सुमेध घाडगे व ता.अध्यक्ष राहुलकुमार टाकणखार यांनी केली आहे.

### शेतकऱ्यांनी गाळ टाकून जमिनीची

विहीरींचे पाणी पातळीत देखील वाढ होणार आहे हा मोठा फायदा आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या रूटी प्रकल्पाची मशिनरी बंद पडू नये यासाठी निधीची कमतरता पडू देऊ नये मी देखील मुख्यमंत्री महोदयांकडे जाऊन आणखी निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न करणार असून शेतकऱ्यांनी समजूतदार म्हणून दाखवावा गाळपेरा करणाऱ्या शेतकऱ्यांनी गाळ काढण्यासाठी सहकार्य करावे पाणी सोडून देऊन त्यांनी रस्ते अडवण्याचे काम करू नये सुरुवातीला या तलावातील चार फूट उंचीची चळ कडू त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही. या तलावातील आणखी साडेसहा लक्ष क्युबिक मीटर गाळ काढू शकतो त्यामुळे जास्तीत जास्त गाळ उपसा करण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन करून ते म्हणाले की,शेतीबरोबरच यापुढे सामूहिक दूध व्यवसायासाठी सामूहिक गाय आणि गोठे असे संकल्पना आपली असून त्यासाठी आंधळेवाडी शिवारातील आपल्या गाय गोठ्याला भेट द्यावी असे आवाहनही त्यांनी यावेळी शेतकऱ्यांना केले.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक म्हणाले की, तलावातील गाळ काढण्याच्या कामाला आमदार सुरेश धस यांचा फार मोठा पाठपुरावा होता आणि ते अत्यंत योग्यच असून कारण तलावातील गाळ जमिनीवर टाकून जमिनीचा पोत वाढवणे ही महत्त्वाची बाब आहे.त्यातून उत्पादन खर्च बचत होत असते हा गाळ म्हणजे सोन आहे. शेतकऱ्यांनी गाळ घेऊन शेतात टाकल्यास अवनी ॲप द्वारे त्यावर नोंदणी होणार असून १००० क्युबिक मीटर्सला हेक्टरी शासनाचे अनुदान मिळणार आहे.अनुदान हे थेट बँक खात्यावर जमा होणार आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही. याची शासन पातळीवर आम्ही खबरदारी घेत आहोत आणि शेतकऱ्यांनी खर्च केल्यास दोन-तीन वर्षात उत्पन्न वाढल्यामुळे हा खर्च निघून जाणार आहे आणि जमिनीचा दर्जा ही कायमस्वरूपी चांगल्या पिक देणारा राहणार आहे. रुटी प्रकल्पातील या आठवड्यामध्ये आपण ६० टक्के उद्दिष्ट साध्य केल्यास आणखी एक लाख क्युबिक मीटर गाळ काढण्यासाठी आपण शासनाकडे पाठपुरावा करू त्या शुभारंभ प्रसंगी देखील आपण पुन्हा उपस्थित राहू असे त्यांनी शेवटी सांगितले.यावेळी केळसांगवी,पिंप्री आष्टी,रुटी इमनगाव इत्यादी गावचे शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### पिंपळवंडी येथे भारतरत्न

मोरे,माजी उपसरपंच दादासाहेब पवार,शिवसेना नेते अशोक पवार,ग्रा.प.सदस्य बंडू अण्णा पवार,पत्रकार बबनराव उकांडे, भाऊसाहेब पवार,तसेच राजू मोरे, दिपक गाडे,विजय मोरे,सुनील पवार,संजय मोरे,संजय गाडे,बाळू गाडे,उमेश गाडे,राजू गाडे,आकाश गाडे,युवराज गाडे,इसाक सय्यद,रशिद शेख,सतीश शिंदे,आकाश मोरे, गौरव माळी आदिसह शिक्षक,विद्यार्थी,ग्रामस्थ उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.१६ एप्रिल २०२५


# वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने पूर्व विदर्भाला झोडपलं

## बागायतदार शेतकरी आर्थिक संकटात, तोंडचा घास हिरावला

ऐन उन्हाळ्यात नागपूरसह पूर्व विदर्भातील अनेक भागात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावत एकच दाणादाण उडवली आहे. या पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून रब्बी पीक मातीमोल झाले आहे. मागील दोन दिवसात भंडारा जिल्ह्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली. काल (११ एप्रिल) सायंकाळच्या सुमारास काही भागात पावसानं अक्षरशः थैमान घातलं. अर्धा तास पडलेल्या या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसात बागायती शेतकरी संकटात सापडले आहेत.

मागील काही दिवसांपासून टोमॅटोला दर मिळत नसल्यानं शेतकरी हतबल झालेले होते. आता लग्न समारंभाचा काळ सुरू झाल्यानं टोमॅटोला चांगले दर मिळायला सुरुवात झाली



असतानाचं अवकाळी पावसानं आता शेतातील टोमॅटो पावसानं खराब झालेत. त्यामुळं शेतकऱ्यांवर पुन्हा आर्थिक संकट ओढवलय. वादळी पावसात आंबा ही गळून पडल्यानं आंबा उत्पादकांवर संकट ओढवलेलं आहे. लग्न समारंभासाठी अनेक ठिकाणी उभारण्यात आलेले पेंडॉल कालच्या वादळी वाऱ्यात उडाले तर, काही ठिकाणी फाटले असल्याची दिसून आले आहे.

वादळी वाऱ्यानं सौर ऊर्जेचे पॅनल उडालेत, शेतकऱ्यांचं मोठे आर्थिक नुकसान

बुधवार आणि गुरुवारला भंडारा जिल्ह्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. या वादळी वाऱ्यानं अनेक ठिकाणचे वृक्ष कोसळल्यानं विद्युत तारा तुटल्यात. मोहाडी तालुक्यात अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात तर काही नागरिकांनी त्यांच्या घरावर सौर ऊर्जेचे शेड उभारून त्यावर सौर पॅनल लावले होते. प्रचंड वाऱ्याच्या वेगानं हे सौर पॅनल तुटले आणि दूरवर जाऊन पडल्यानं शेतकऱ्यांचं मोठं आर्थिक नुकसान झालं आहे. सुदैवानं सोलर पॅनल उडून दूरवर पडत असताना कुठलीही जीवितहानी झाली नाही.

अकोल्यात उन्हाचा पारा वाढला, प्राण्यासाठी पाणवठ्याची सोय

दुसरीकडे, अकोला जिल्ह्याचा उन्हाचा पारा सातत्याने वाढतोय. एप्रिल महिन्यात उन्हाचा पारा ४४ अंशावर पोहचलाय. मात्र या वाढत्या उन्हामुळे वन्यप्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागणार नाहीये. यासाठी काटेपूर्णा अभयारण्य तसेच कारंजा अभयारण्य येथे वन्यजीव विभागामार्फत वन्य प्राण्यांची तहान भागविण्यासाठी पाणवठ्याची सोय करण्यात आलीये. याचबरोबर काळवीटांचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या कारंजा काळवीट अभयारण्यात २२ ठिकाणी पाणवठ्याची सोय करण्यात आलीये. काटेपूर्णा अभयारण्यात बिबट, अस्वल, चितळ, नीलगाय, कोल्हा या प्रमुख प्राण्यांसह विविध प्रजातीचे पक्षी या पाणवठ्यावर पाणी प्यायला येतायेत.. त्यामुळे आता वन्य प्राण्यांचा पाणी प्रश्न मिटलाय..

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८५३ : भारतातील पहिली रेल्वेगाडी बोरीबंदर ते ठाणे या लोहमार्गावर धावण्यास सुरुवात झाली.
१९१९ : साली पंजाब मधील अमृतसर येथे झालेल्या जालीयनवाला बाग हत्याकांड प्रकरणी निधन पावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली देण्यासाठी महात्मा गांधी यांनी आजच्या दिवशी उपवास करण्याची घोषणा केली होती.
१९२२ : मुळशी सत्याग्रह सुरू झाला.
१९४८ : राष्ट्रीय छात्र संघाची स्थापना
१९७२ : केप कॅनव्हेरॉल, फ्लोरिडा येथून 'अपोलो-१६' या अंतराळयानाचे प्रक्षेपण करण्यात आले.
१९९५ : देशातील लोकशाही टिकवुन ठेवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा गौरव म्हणून मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांना 'ऑनेस्ट मॅन ऑफ द इयर' हा पुरस्कार प्रदान
१९९९ : चालकरहित 'निशांत' विमान व जमिनीवरुन हवेत मारा करणार्या 'त्रिशूल' क्षेपणास्त्राची रिसातील चंडीपूर येथे चाचणी
२०१३ : इराण या देशांत झालेल्या भूकंपामुळे ३७ नागरिकांचा मृत्यू झाला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४८ : कंडुकुरी वीरेसलिंगम, आंध्र प्रदेशमधील समाजसुधारक.
१८६७ : विल्बर राईट, अमेरिकन विमानसंशोधक.
१८८९ : चार्ली चॅप्लिन, अभिनेता, दिग्दर्शक आणि संगीतकार
१८९६ : मद्रास विद्यापीठातील पुरातत्व शास्त्राचे माजी प्राध्यापक विष्णमपेट आर. रामचंद्र दीक्षित यांचा जन्मदिन.
१९२४ : भारतीय राजनयिक मदनजीत सिंग यांचा जन्म.
१९२५ : भारतीय मुत्सद्दी, चित्रकार, छायाचित्रकार आणि लेखक मदनजीत सिंग यांचा जन्मदिन.
१९३४ : रामचंद्र दामोदर तथा राम नाईक केन्द्रीय पेट्रोलिअम मंत्री, रेल्वे राज्यमंत्री व भाजपचे नेते
१९४२ : विल्यम्स एफ-१ रेसिंग टीमचे स्थापक फ्रँक विल्यम्स यांचा जन्म.
१९६१ : भारतीय वकील आणि राजकारणी जर्बोम गॅमलिन यांचा जन्म.
१९६३ : सलीम मलिक पाकिस्तानी क्रिकेटपटू
१९७२ : कोंचिता मार्टिनेझ स्पॅनिश लॉनटेनिस खेळाडू
१९७८ : लारा दत्ता मॉडेल, हिन्दी चित्रपट अभिनेत्री व निर्माती, मिस युनिव्हर्स (२०००)
१९९१ : चित्रपट आणि नाटक अभेनेते आशिष खाचणे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७५६ : जॅक्स कॅसिनी फ्रेन्च खगोलशास्त्रज्ञ (जन्म: ८ फेब्रुवारी १६७७)
१८५० : मेरी तूसाँ 'मॅडम तूसाँ वॅक्स म्युझियम'च्या संस्थापिका (जन्म: १ डिसेंबर १७६१)
१९५१ : प्रसिद्ध बंगाली भाषिक लेखक अद्वैत मल्लाबरमन यांचे निधन.
१९६१ : गुरुद्वारा सुधार चळवळ तसचं, अखंड किर्थनी जथाची स्थापना करणारे प्रसिद्ध शीख नेते रणधीर सिंह यांचे निधन.
१९६६ : जगविख्यात चित्रकार नंदलाल बोस श्री. बोस यांनी शांतिनिकेतनमधे सुमारे ३० वर्षांहून अधिक काळ अध्यापन करून अनेक चित्रकार तयार केले. (जन्म: ३ डिसेंबर १८८२)
१९९५ : रमेश टिळेकर अभिनेते व वकील, 'घाशीराम कोतवाल' या नाटकातील भूमिकेसाठी प्रसिद्ध (जन्म:)
२००० : दिनकर गोविंद तथा अप्पासाहेब पवार ग्रामीण विकासाचा ध्यास घेतलेले कृषीतज्ञ, कोल्हापुरच्या शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू, शाहू महाराजांचे चरित्रकार (जन्म: १९३०)
२००७ : भारतीय वंशाचे अमेरिकन प्राध्यापक गोबीचेट्टीपालम वासुदेवन ''जी. व्ही.'' लोगानाथन यांचे निधन.

## या महिन्यातच करा ज्वारी, बाजरी आणि मकाची लागवड!



भरपूर व उत्कृष्ट प्रतिचा चारा सातत्याने मिळण्यासाठी धान्य पिका प्रमाणेच चारा पीक लागवडीचे नियोजन करणे गरजेचे असते. सध्या महाराष्ट्रात चारा टंचाई मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली आहे. मार्च, एप्रिल महिन्यात ज्वारी, बाजरी आणि मका या चारा पिकांची लागवड केली जाते. जाणून घेऊ या पिकांच्या लागवडीविषयी माहिती.

जमीन : ज्वारी पिकासाठी मध्यम, बाजरी साठी हलकी ते मध्यम व मका पिकासाठी मध्यम ते भारी जमिनीची निवड करावी.

सुधारित वाण : ज्वारी : रुचीरा आर-४-११, मालदांडी ३५-१, निळवा, एमपी चारी, पुसा चारी, आय एस ४७७६, एएसजी १४, एमकेव्ही चारी.बाजरी : जाएन्ट बाजरा, गराजको. मका : आफ्रीकन टॉल, मांजरी, कंपोझीट विजय, गंगासफेद डेक्कन हायब्रीड.

बियाणे : ज्वारी - प्रति हेक्टरी २० किलो बियाणे वापरावे

बाजरी - प्रति हेक्टरी १० किलो बियाणे वापरावेमका - प्रति हेक्टरी ४० ते ४५ किलो बियाणे वापरावेलागवड पद्धत आणि पेरणीचे अंतर : ज्वारी, बाजरी आणि मका या तिन्ही पिकांची लागवड पाभरीने पेरणी करून करावी. लागवडीसाठी ३० ४५ सें. मी. अंतर ठेवावे.खते प्रति हेक्टरी : ज्वारी, बाजरी आणि मका पिकांसाठी २५३० टन कंपोस्ट, नत्र ८० किलो, स्फुरद ४० किलो व पालाश ४० किलो याप्रमाणात खते द्यावी.पाणी व्यवस्थापन : या पिकांना इतर हंगामात पाणी देणे गरजेचे असते. परंतु उन्हाळ्यात ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.उत्पादन : योग्य व्यवस्थापन केल्यास प्रति हेक्टरी ज्वारीचे ४० ते ४५ टन, बाजरीचे ३५ ते ४० टन आणि मक्याचे ४५ ते ५० टन उत्पादन मिळू शकते.

## गूळ तयार करण्यासाठी योग्य ऊस ओळखा


राज्यात मोठ्या प्रमाणात ऊस लागवड केली जाते. प्रामुख्याने महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेश हे दोन राज्य देशातील आघाडीवरील ऊस उत्पादक राज्य आहेत. त्यामुळे या दोन्ही राज्यांमध्ये साखरनिर्मिती व्यवसाय आणि गूळ निर्मिती व्यवसाय चांगलाच बहरला आहे. मात्र आता गूळनिर्मिती करताना उसाची पारख कशी करायची? असा प्रश्न गुऱ्हाळ चालवणाऱ्या शेतकऱ्यांसमोर असतो. साधारपणे शेतकरी पारंपरिक पद्धतीने अंदाज लावत उसाची निवड करतात. हे चुकीचे असून शेतकऱ्यांना त्यातून आर्थिक तोटा संभवतो. याच पार्श्वभूमीवर नेमकी गूळनिर्मिती व्यवसाय करताना काय काळजी घेतली पाहिजे? याबाबत आज आपण जाणून घेणार आहोत.

गूळनिर्मिती व्यवसायातील तज्ज्ञांच्या मते, ज्या उसाच्या माध्यमातून गूळनिर्मिती केली जाणार आहे. त्याची निवड करताना शेतात तोडणीच्या आधीपासूनच काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी १२०० रुपयांना मिळणाऱ्या ब्रिक्स मीटर खरेदी करावे. वापरात असलेल्या उसाच्या रसाचे काही थेंब टाकून बघावेत. या मीटरमध्ये तुम्हाला आकाशी आणि सफेद असे दोन रंग दिसले. किंवा मग या मीटरमध्ये रसाची व्हॅल्यू ही २० हुन अधिक असेल तर तो ऊस गूळनिर्मितीसाठी सर्वोत्तम मानला जातो. इतकेच नाही तर गूळनिर्मितीसाठी उसाची तोडणी केल्यानंतर हा ऊस अधिक काळ तसाच न ठेवता. त्याचे २४ तासांच्या आत गाळप होणे आवश्यक असते. याशिवाय गाळपाला काहीसा वेळ असेल तर तोडणी करून आणलेला ऊस उन्हात ठेवू नये. यामुळे



प्रत्येक दोन तासाला उसातील २ टक्के सुक्रोजची घट होते. हे गूळनिर्मिती साठी खूप नुकसानदायी ठरू शकते. त्यामुळे सकाळी आणल्यानंतर दिवसभरात त्या उसाचे गाळप होणे गरजेचे असते.गाळपानंतर पुढील प्रक्रिया गूळनिर्मितीसाठी रस कढईत टाकण्याची असते. उसाचा कढईत टाकल्यानंतर त्यातील सुक्रोज हे ग्लूकोज आणि फ्लोक्टोजमध्ये रूपांतरित होऊ नये. म्हणून शेतकऱ्यांनी काळजी घेतली पाहिजे. यासाठी तुरटीचा वापर देखील केला जाऊ शकतो. किंवा मग संबंधित उसाच्या रसाचा पीच देखील जाणून घेतला जाऊ शकतो. तो ६.४ ते ६.८ दरम्यान असणे आवश्यक असते. संपूर्ण गूळनिर्मिती प्रक्रिया दरम्यान खूप काळजी घ्यावी लागते. मात्र, या त्यातील काही महत्वाच्या स्टेप्स आहेत. ज्या गूळनिर्मिती व्यवसायातील तोटा कमी करण्यास अर्थात आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होते. याशिवाय शेतकऱ्यांनी उसाचा रस काढण्यासाठी हॉरिजॉन्टल क्रॉशर (आडवे रस यंत्र) वापरले पाहिजे. ज्यामुळे १० टक्के अधिक रस मिळण्यास मदत होते. इतकेच नाही तर कढईमध्ये रस उकळवताना ११४ डिग्रीपर्यंत उकळला पाहिजे. त्यापेक्षा अधिकही नको आणि कमीही नको. या योग्य तापमानात रस उकळल्यास त्यातून उत्तम प्रतीचा गूळ बनतो. साखर कारखान्यात साखर तयार करण्यासाठी १२१ डिग्रीपर्यंत उसाचा रस उकळला जातो.

## पॉलिहाऊसमध्ये गुलाबाची लागवड करा आणि कमवा लाखो रुपये



ज्यावर राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून ५० टक्के अनुदान दिले जाते. या फुलाची लागवड फक्त पॉलीहाऊसमध्येच केली जाते. डच गुलाब वाढवण्यासाठी, पॉलीहाऊसमध्ये सुमारे ३२-३५ अंश सेल्सिअस तापमान असणे आवश्यक आहे. हिवाळ्यात पिकाची काढणी करणे फायदेशीर ठरते. डच गुलाबांना भारताबरोबरच जपान, नेदरलँड आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये मागणी जास्त आहे.

जर तुम्ही फळे आणि भाज्यांची लागवड करून कंटाळा करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी उपयुक्त आहे. फळे आणि भाजीपाला व्यतिरिक्त गुलाबाची लागवड करून शेतकरी भरघोस नफा कमवू शकतात. शेतकरी पॉलिहाऊसमध्ये डच गुलाबाची लागवड करू शकतात. या फुलाचे वेगळेपण आहे, तज्ज्ञांच्या मते, या फुलाचा रस उसाच्या रसापेक्षा कितीतरी पटीने गोड असतो. यासोबतच बाजारातही भरपूर मागणी आहे. या फुलाचा वापर सजावटीसाठीही केला जातो. या फुलाची लागवड शेतकऱ्यांचे नशीब बदलू शकते. पॉलिहाऊसमध्ये या फुलाच्या लागवडीसाठी अनुदानही उपलब्ध आहे. तज्ज्ञांच्या मते, एक एकरमध्ये पॉलीहाऊस उभारण्यासाठी सुमारे ७० लाख रुपये खर्च येतो.

ज्यावर राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून ५० टक्के अनुदान दिले जाते. या फुलाची लागवड फक्त पॉलीहाऊसमध्येच केली जाते. डच गुलाब वाढवण्यासाठी, पॉलीहाऊसमध्ये सुमारे ३२-३५ अंश सेल्सिअस तापमान असणे आवश्यक आहे. हिवाळ्यात पिकाची काढणी करणे फायदेशीर ठरते. डच गुलाबांना भारताबरोबरच जपान, नेदरलँड आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये मागणी जास्त आहे. शेतकरी हे फूल पिकवून परदेशात पुरवठा करू शकतात. केवळ एक एकर शेतात दररोज ४५ ते ५० किलो गुलाबाची फुले येतात. जी चांगल्या किमतीत विकली जाते. या फुलाची लागवड करून शेतकरी बांधवांना दररोज १० ते २० हजार रुपयांचा नफा मिळू शकतो. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ देखील फुलांच्या उत्पादनावर उत्कृष्ट अनुदान देते.

रशिया आणि युक्रेनच्या युद्धामुळं महागाईचा भडका उडाला. भारतातील भल्याभल्यांचं तर कंबरडं मोडलंच, सोबतच प्रत्येक व्यक्तीला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आजही याची झळ सोसावी लागत आहे. पण रशिया-युक्रेनच्या युध्दामुळं पुण्याच्या मावळमधील मुकुंद ठाकरेंना कमालीचा फायदा झाला आहे. गुलाबातून त्यांनी चांगली कमाई केली आहे.

## शेणखतापासून बनतोय माशांचा चारा

कॉमन कॉर्प आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात जिरे टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही. शेतीसोबतच शेतकरी मत्स्यपालनही मोठ्या प्रमाणावर करतात. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. याशिवाय मत्स्यपालनासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदतही केली जाते. काहीवेळा शेतकऱ्यांना मत्स्यपालनाशी संबंधित फारशी माहिती नसल्याने मत्स्यपालनात नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला मत्स्यपालनाशी संबंधित अशा तंत्रांबद्दल सांगणार आहोत, ज्याचा अवलंब करून मत्स्यपालनातून चांगले उत्पादन मिळवू शकता.

मत्स्यपालनासाठी तळ्याची खोली किती असावी? : मत्स्यपालनासाठी तलावाची खोली पाच ते सहा फूट असावी जेणेकरून माशांची वाढ झपाट्याने होईल. पाच ते सहा फूट खोल तलावामध्ये सूर्यकिरण प्लँक्टन उचलतात आणि तलावाच्या पृष्ठभागावर पोहोचतात. त्यामुळे तलावाच्या खोलीपर्यंत प्लँक्टन आढळून येतो. विशेष म्हणजे पाण्याच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर प्लवकांचे प्रमाणही वेगवेगळे असते. वरच्या स्तरावर जास्त प्रकाश पडल्यामुळे एकूण प्लवकांपैकी सुमारे ६० टक्के येथे उपस्थित आहे. तर तलावाच्या मधल्या आणि खालच्या पातळीवर



२० टक्के प्लँक्टन उपलब्ध आहे. यामुळे सर्व मासे वेगवेगळ्या स्तरावर अन्न शोधतात.

संमिश्र मत्स्यपालन वापरा : कॉमन कॉर्प आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात जिरे टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही.

शेणामुळे माशांचे वजन वाढेल : जर शेतकऱ्यांकडे माशांचे खाद्य खरेदी करण्यासाठी पैसे नसतील तर ते स्वत: घरी माशांचे खाद्य तयार करू शकतात. यासाठी शेतकरी गाई-म्हशींच्या शेणाचाही वापर करू शकतात. गाईच्या शेणावरही मासे जगू शकतात. शेतकरी थेट तलावात शेण टाकू शकतात. याशिवाय शेळीची विष्ठाही वापरता येते. शेळीची विष्ठा पावडरमध्ये बारीक करून तळ्यात मिसळा, जे चारा म्हणून काम करेल. शेळीची विष्ठा पाण्यात सहज विरघळते, त्यामुळे मासे ते सहज खाऊ शकतात.

सुरुवातीला २ हजार किलो शेण टाका

भारतीय कृषी संशोधन परिषदेने () केलेल्या संशोधनात हे सिद्ध झाले आहे की, शेणात असलेले घटक खाल्ल्याने मासे जलद वाढतात. यामुळेच ने माशांसाठी ग्लोबल गोळ्याही बनवल्या आहेत. याचे कारण म्हणजे शेणात नायट्रोजन मोठ्या प्रमाणात आढळतो आणि मासे ते खातात तेव्हा त्यांचे वजन झपाट्याने वाढते. एक हेक्टरमध्ये मत्स्यशेती सुरू केल्यास प्रथम तलावात २ हजार किलो शेण घाला आणि त्यानंतर दरमहा १ हजार किलो शेण घाला. त्यामुळे माशांचे वजन झपाट्याने वाढेल आणि तुमचे उत्पन्नही वाढेल.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाल चिखल आक्रोश आंदोलन

## सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध शेतीमालाला भाव नाही , उत्पादन खर्च अधिक आणि उत्पन्न कमी

बीड। प्रतिनिधी

दुष्काळ , अवकाळी पाऊस नापिकी या अस्मानी संकटासोबतच शेतीमालाला भाव नसणे , सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या सुलतानी संकटाचा सामना करावा लागत असुन शेतीमालाला हमीभाव नसुन उत्पादन खर्च अधिक आणि उत्पन्न कमी असुन सरकारच्या आर्थिक धोरणांमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी एका एकरात तब्बल दीड लाख रुपये खर्च करून आलेलं टोमॅटो पिक विक्रीसाठी परवडत नसल्याने झाडावरचं शेतात खराब होऊ लागले आहे त्यांना नुकसान भरपाई मिळावी आणि शेतकऱ्यांप्रती वारंवार असंवेदनशील वक्तव्य करणाऱ्या कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१५ मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात



टोमॅटो तुडवत लक्ष्यवेधी लाल चिखल आक्रोश आंदोलन करण्यात आले.जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक ढास,शेख युनुस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, प्रदीप औसरमल, गौतम कोरडे,आप जिल्हाध्यक्ष अशोक येडे आदी सहभागी होते.

अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करत शेतकरी शेती करतो. त्यातही वाढलेल्या खत बियाणे, युरीया आणि फवारणीच्या औषधांच्या वाढत्या किंमती,मजुरीच्या दरात वाढ,वाहतुकीचा खर्च करून पिकविलेल्या मालाला कमी भावात बाजारात विकावे लागते.नाईलाजाने शेतकऱ्यांना कमी किंमतीत शेतमाल विकुन आर्थिक नुकसान सहन करावे लागते.यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकटाचा सामना करण्याची वेळ आली आहे. सरकारच्या धोरणांमुळे शेतीमालाला भाव मिळत नसुन शेतकऱ्यांवर अन्याय होत असुन नापिकीमुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे.यातुन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल शेतकरी उचलत आहेत. शेतमालाला भाव मिळत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत.सरकारची ऊदासीनता याला जबाबदार असुन शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे मुश्किल झाले आहे.सरकारचे आर्थिक धोरण शेतकऱ्यांना मारक ठरत आहे. शेतक-यांच्या शेतीमालाला योग्य हमीभाव मिळावा यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी तब्बल दिड लाख रुपये खर्चून टोमॅटोचे पिक आणले.मात्र विक्रीसाठी परवडत नसल्याने टोमॅटो शेतातच झाडावर पिकुन गळु लागले आहेत. त्यांच्या शेतातील २०० किलो टोमॅटो लाल चिखल आक्रोश आंदोलनासाठी वापरण्यात आले असुन अशोक ढास आंदोलनात सहभागी होते.अस्मानी आणि सुलतानी संकटांनी आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांप्रती कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे पिक विमा प्रकरणी भिका-याशी शेतकऱ्यांची तुलना करतात तर कधी शेतकरी कर्जमाफीचा पैसा शेतीत न गुंतवता साखरपुडा आणि लग्नावर खर्च करतात तर कधी शेतकरी जास्त उत्पादन करत असल्याने शेतमालाला भाव नाही असे वारंवार असंवेदनशील वक्तव्य करत असुन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी त्यांना याबाबत समज द्यावी आणि त्यांच्यात सुधारणा होत नसेल तर त्यांना कृषी मंत्री पदावरून हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

## थोडक्यात

### नवगण राजुरी येथे शुक्रवारी जंगी कुस्त्यांचे सामने

राजुरी। प्रतिनिधी

येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सय्यद जानपीर उरूस निमित्त शुक्रवार दि.१८ एप्रिल रोजी जंगी कुस्त्यांच्या सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे. सय्यद जानपीर उरूस निमित्त नवगण राजुरी येथे बुधवार दि.१६ रोजी संदल आणि भव्य मिरवणूक निघणार आहे. गुरूवार दि.१७ रोजी ताजी यात्रा व शुक्रवार दि.१८ एप्रिल रोजी जंगी कुस्त्यांचे सामने होणार आहेत. या कुस्त्यांच्या हंगामात अनेक मोठमोठ्या कुस्त्या होणार आहेत. कुस्ती विजेत्या मल्लास बक्षीस देण्यात येणार असून नामांकित कुस्ती विजेत्यास श्री गजानन सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन रविंद्र क्षीरसागर यांच्या हस्ते रोख २१०००/-रू बक्षीस देण्यात येणार आहे तरी या कुस्त्यांच्या हंगामास जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील कुस्तीगीर मल्लांनी सहभागी व्हावे असे आवाहन सय्यद जानपीर उरूस कमिटी नवगण राजुरी यांनी केले आहे.

### खर्डेवाडी येथे तनया दिदी बढे यांचे हरीकिर्तन

बीड। प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे खर्डेवाडी येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी चैत्र वद्य पंचमी दि.१८/४/२५ ला अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. महादेव महाराज तात्या,ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे .ह.भ.प.भिवसेन महाराज भोसले,ह.भ.प राजेन महाराज भोसले यांच्या शुभ हस्ते सप्ताहाची सुरवात होणार आहे . या सात दिवस चालणाऱ्या नाम सप्ताह मध्ये काकडा, भजन,ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन ,भावार्थ रामायण,प्रवचन, हरिपाठ व हरिकिर्तनआणि हरिजागर असे विविध कार्यक्रम आहेत .

या सप्ताह मध्ये ह.भ प. राजेन महाराज भोसले,ह.भ प. श्रीनिवास महाराज जगताप,ह.ह.प. श्री किसन महाराज पवार,ह.भ.प. रतन महाराज,ह.भ.प.सतीश महाराज, ह भ.प. दिपक महाराज तसेच सप्ताहात एकमेव महिला कीर्तनकार ह.भ.प. तनाया दिदी बढे , खेड जी.पुणे यांचे शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत शुश्राव्य हरिकीर्तन होणार आहे तरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सर्व कार्यक्रमाचा आनंद घ्यावा.असे आवाहन मुकादम मंडळ खर्डेवाडी यांनी केले आहे २५ एप्रिल २०२५ रोजी शुक्रवार सकाळी ११ ते १ या वेळेत ह.भ.प. श्री लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता होईल. या सप्तहासाठी मृंदग सेवा बाळू महाराज बसवर ,गणेश महाराज भोसले आणि गोविंद महाराज भोसले यांची राहणार आहे तरी सर्व भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताहातील सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन भजनी मंडळ आणि गावकरी मंडळी खर्डेवाडी यांनी केले आहे.

# माणसाचे निरवैरत्व माणसाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाते - वारंगे महाराज

फुलसांगवी। प्रतिनिधी

माणसाने समाजामध्ये जीवन जगत असताना कोणाशी वैर निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. समाजामध्ये वैर निर्माण झाला तर अधोगती निर्माण होते या उलट माणूस निर्वैर जीवन जगला तर माणसाची निश्चितच प्रगती होते. माणसाचे निर्वैरत्व माणसाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जात असल्याचे प्रतिपादन भजनसम्राट युवा कीर्तनकार हभप. गणेश महाराज वारंगे यांनी तिंतरवणी येथे केले आहे.

शिरूर कासार तालुक्यातील तिंतरवणी येथे पावन दक्षिण मुखी हनुमानाचे मंदिर असून ग्रामस्थांच्या आयोजनातून या ठिकाणी हनुमान जन्मोत्सव,श्री.संत वामनभाऊ महाराज व संतश्रेष्ठ भगवान बाबा यांच्या मूर्तीप्रतिष्ठा दिना निमित्त हभप.महंत बालाजी महाराज शेंडगे



यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली गेल्या सहा दिवसापासून भव्य स्वरूपात अखंड हरिनाम सप्ताह पार पडत आहे. या सप्ताहाच्या सहाव्या दिवशी भजन सम्राट हभप.गणेश महाराज वारंगे यांचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. कीर्तनाच्या माध्यमातून हभप.गणेश महाराज वारंगे यांनी माणसाच्या जीवनामध्ये निर्वैरत्व प्राप्त झाले तर माणूस फायद्याचाच राहतो. आपल्या सोबत कोणी वैर,भांडण करू इच्छित असेल तर आपण दोन पावले मागे सरकावे. माणसाने वैरत्व स्वीकारले तर जीवनामध्ये मोठा तोटा सहन करावा लागतो. वैरत्वाने अनेकांचे संसार उध्वस्त झालेले आहेत.अनेकांना वैरत्वामुळे कारावासही भोगावा लागला आहे. माणसाने वैरत्व केले तर त्याचा तोटा निश्चित सहन करावा लागतो. आणि मनस्ताप ही होत असतो. याउलट माणसाने निर्वैरत्व जीवन जगले तर माणुस केव्हाही फायद्यातच राहतो. किंबहुना निर्वित्व जीवन हे संतत्वाला प्राप्ती मिळून देत असते. म्हणून माणसाने निर्वैर जीवन जगावे. माणसाचे निर्वैरत्व हे माणसाला प्रगतीच्या दिशेने घेत जात असल्याचे प्रतिपादन यावेळी हभप.गणेश महाराज वारंगे यांनी तिंतरवणी येथील सप्ताहामध्ये केले. यावेळी हभप.भाऊसाहेब महाराज खेडकर, बंडू महाराज जरांगे, तीर्थराज महाराज धस, आदिनाथ महाराज जरांगे, अंकुश महाराज खेडकर, अमोल महाराज अंकुश, नवनाथ महाराज कापरे, गजानन महाराज अंकुश आदी टाळकरी मंडळी सह महाराष्ट्र पोलीस पाटील असोशियनचे महादेव नागरगोजे पाटील, माजी सरपंच डॉ. उद्धव खेडकर, डी.एम. खेडकर सर, डॉ. किसन खेडकर आदींसह मोठ्या संख्येने भाविक-भक्त उपस्थित होते.

वैरत्वामुळे बीड जिल्हा चर्चेत

माणसा माणसांमध्ये वैरत्व निर्माण झाले यामुळे बीड जिल्ह्याची प्रतिमा मलीन झाली आहे. गेल्या काही महिन्यापासून बीड जिल्ह्याच्या नावाने वैरत्वामुळे अपप्रचार होत आहे. एकीकडे संत महंत, कीर्तनकारांची जन्मभूमी म्हणून बीड जिल्ह्याला ओळखले जाते. वैरत्वामुळे बीड जिल्ह्याचा अपप्रचार होत असल्याची खंत यावेळी गणेश वारंगे महाराज यांनी व्यक्त केली आहे.

# फुले शाहू आंबेडकर हे जगण्याचे सूत्र -डॉ. सतीश साळुंके

बीड। प्रतिनिधी

'जयभीम' हा केवळ उद्गार नाही तर विचार आहे. फुले शाहू आंबेडकर हे जगण्याचे सूत्र आहे. वर्तमान काळ प्रस्थापितां विरुद्ध विस्थापित अशा लढाईच्या काळ आहे. ही लढाई केवळ फुले-शाहु-आंबेडकर -गाडगे महाराज या विचार शस्त्रांनीच जिंकता येऊ शकते. यासाठी वंचित बहुजनांनी एकत्रित यायला हवं असे प्रतिपादन डॉ. सतीश साळुंके यांनी केले.

परिवर्तन प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कार्यक्रमात ते बोल होते. कार्यक्रमाच्या आरंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले व गाडगेबाबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक सरवदे यांनी केले. डॉ. साळुंके पुढे म्हणाले की, शाहू,फुले, आंबेडकर, गाडगेबाबा ही विचारांची साखळी आहे. बाबासाहेबांचे वडील रामजी सपकाळ हे पुण्यात असताना महात्मा फुलेंची वारंवार भेटत व त्यातून शिक्षणाचे महत्व त्यांनी ओळखले तर म. फुलेंनी सांगितलेल्या शिक्षणाचा प्रचार राजर्षी शाहू महाराजांनी केला. त्यांनी बाबासाहेबांना शिक्षणासाठी मोठी मदत केली. इतकेच काय दलितांचे नेतृत्व बाबासाहेब यांनीच करावे असे त्यांनी निक्षुण सांगितले.

# गायराण धारकांवर होणारा अन्याय थांबवा-कॉ अजय बुरांडे

## भूमिहीन दलित शेतकरी कसत असलेल्या जमीनी खाजगी कंपनीला देण्याचा घाट

परळी / प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील ५० वर्षा पासुन भुमीहिन दलीत कसत असलेली गायराण जमीन ताब्यात घेण्यासाठी शासनानी सुरू केलेली दडपशाही थांबवून त्यांची अतिक्रमणे नियमाकुल करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने मंगळवार (ता.१५) परळी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर निदर्शने करण्यात आली.

राज्यभरातील शेतकऱ्यांच्या ताब्यातील गायराण जमीन खाजगी विज कंपनीला सरकार देत आहे. अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील मागील ४० वर्षापेक्षा अधिक काळापासून भुमीहिन दलित शेतकरी कसत असलेली जमिनीची ताबा वहीतिची महसूल दरबारी नोंद असतानाही त्यांची अतिक्रमणे शासन



निर्णयाप्रमाणे नियमित करणे आवश्यक असतानाही ती न करता उलट पक्षी शासन पोलीसांमार्फत दडपशाही करुन त्यांना हुसकावून लावण्याच्या प्रयत्न करीत आहेत. राज्यभरातील गायराण जमिनीवर मागील अनेक वर्षांपासून भूमिहीन दलित, अल्पसंख्यांक शेती वहीती करतात तर काही ठिकाणी राहण्यासाठी वापरतात.अशा या जमिनी खाजगी विज निर्मिती करण्याऱ्या कंपन्यांना सरकार देत आहेत. याविरोधात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने मंगळवार (ता.१५) परळी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालया समोर तीव्र निदर्शने करण्यात आली.यावेळी माकप जिल्हा सचिव कॉ.एड.अजय बुरांडे, कॉ.पी एस घाडगे, कॉ.बी जी खाडे, कॉ.पांडुरंग राठोड, कॉ.गंगाधर पोटभरे, कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ.सुदाम शिंदे, कॉ.प्रकाश उजगरे, कॉ.किरण सावजी, कॉ.राधाकिशन जाधव, कॉ. पप्पु देशमुख, कॉ.मनोज देशमुख यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील भूमिहीन अल्पसंख्याक दलित समाज मागील ४० वर्षांपासून गायरान जमीनी कसून आपली उपजीविका करत आहे.याबाबत ताबा वहीतीची नोंद महसूल विभागात असताना देखील ३१ एक्कर जमिनी पैकी १५ एक्कर जमिनी खाजगी वीज निर्मिती कंपनीला भाडेतत्वावर देत या दलित बांधवाना परत भूमिहीन करण्याचा घाट शासनाने घातला आहे.सरकारच्या या निर्णयाविरोधात मागील ३ महिन्यापासून हे बांधव लढत असून या प्रकरणात चार भूमिहीन दलित शेतकरी बांधवांनी विष प्राशन करून आत्महत्या करण्याच्या प्रयत्न केला. शासनाच्या या अन्यायकारक कृत्याचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तीव्र निषेध व्यक्त करत या शासनाच्या निर्णयाविरोधात तीव्र लढा माकप करणार आहे.

# नारळी सप्ताहाच्या परंपरेला मुर्त स्वरूपासह वैभव देण्याचे काम बंकटस्वामींनी केलं -लक्ष्मण महाराज मेंगडे

बीड। प्रतिनिधी

नारळी सप्ताहाच्या परंपरेला मुर्त स्वरूपासह वैभव देण्याचे काम बंकटस्वामींनी केलं.. असे प्रतिपादन लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले.. वारकरी संप्रदायाचे भक्ती सूर्य महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ७२ व्या फिरत्या नारळी सप्ताहाची बीड तालुक्यातील सावरगाव घाट गावात लाखो भाविक भक्ताच्या उपस्थितीत थाटात सांगता झाली.कालाच्या कीर्तन प्रसंगी ते बोलत होते.या यावेळी प्रमुख उपस्थिती मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील, गंगाधर नाना काळकुटे, हनुमान मुळीक,ह भ प रामहरी महाराज डंबरे, भीमसेन महाराज भोसले,श्री ह भ प नाना महाराज कदम, ह भ प सुरेश महाराज जाधव, श्री हरिदास भाऊ जोगदंड,श्री ह भ प विष्णुपंत लोंढे गुरुजी, श्री ह भ प वसंत महाराज शिंदे, श्रीनिवास महाराज जगताप, श्रीकृष्ण महाराज यादव ,श्री ह भ प अच्युत महाराज घोडके, दिनेशानंद महाराज शास्त्री, ,श्री ह भ प योगेश महाराज जोगदंड , भारत बाप्पा काळे, बडगे बापू, सखाराम मस्के ,अशोक शिंदे ,कालिदास आप्पा पाटील,यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

बीड तालुक्यातील मौजे सावरगाव घाट येथे श्री गुरू बंकटस्वामी महाराज यांचा वै. संत सुदामदेव महाराज यांनी सुरू केलेला ७२



व्या फिरत्या नारळी सप्ताहाची थाटात सांगता झाली. सात दिवस महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार यांचे कीर्तने झाली. रामायणाचार्य प्रा. नाना महाराज कदम यांचे सुंदर तुलसी श्री राम कथा संपन्न झाली.त्याबरोबरच ज्ञानेश्वरी पारायन, गाथा भजन, कीर्तन प्रवचन आदी कार्यक्रमाची रेल चेल होती. सोमवारी सकाळी दिंडी नगर प्रदक्षिणा नंतर काल्याच्या कीर्तनाला सुरुवात झाली. यावेळी जगतगुरु तुकाराम महाराज यांच्या गवळणी पर अभंगावर मेंगडे महाराज यानी चिंतन मांडले.

गौळीयाची ताकपिरें । कोण पोरें चांगलीं ।।१।। येवढा त्यांचा छंद देवा । काय सेवा भक्ती ते ।।ध्रु.।। काय उपास पडिले होते । कण्याभोंवते विदुराच्या ।।२।। तुका म्हणे कुब्जा दासी । रूपरासी हीनकळा ।।३।। पुढे बोलताना महाराज म्हणाले की. महाराष्ट्रात नारळी सप्ताह ही खूप मोठी परंपरा आहे बंकटस्वामी महाराज याच्या सर्व शिष्य मंडळीनी फिरत्या सप्ताहाच्या माध्यमातून संपूर्ण समाज एकत्रित करण्याचे खूप मोठे काम केले. संत बंकट स्वामी महाराज यांनी नारळी सप्ताहाच्या परंपरेला मूर्त स्वरूपासह वैभव देण्याचे काम केले.. त्यामुळेच आज संपूर्ण महाराष्ट्रातील गोड आणि फळांची नारळी सप्ताह भव्य दिव्य प्रमाणात होतात.. राजसत्ता ही धर्म सत्तेच्या मार्गदर्शनाने चालली पाहिजे.तर सुसमाज निर्माण होवून शकेल असे विचार मांडले. राग लोभ आणि भांडण बाजूला ठेवून अध्यात्मा बरोबर ऐक्यने राहण्याचा मार्ग ही सांगीतला. कीर्तनानंतर जरांगे पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ७३ व्या नारळी सप्ताहाचा नारळ मान्यवर मंडळी च्या उपस्थितीत मौजे गावकरी मंडळी मांडवखेल ता.जि.बीड या ठिकाणी देण्यात आला. कीर्तनानंतर गावकरी मंडळी सावरगाव घाट यांच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला. श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या मार्गदर्शन व गावकऱ्यांच्या सहकार्याने विविध विधायक कार्यक्रम आयोजित करण्यात आले...यावेळी बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व गुनीजन टाळकरी महाराज मंडळीची उपस्थित होती.

संत बंकट स्वामी महाराजांच्या नारळी सप्ताहात सहभागी होण्याचे भाग्य मिळाले. भव्य दिव्य त्याची प्रचिती या ठिकाणी आली. संत बंकट स्वामी महाराज यांनी बहुजनातील लोकांना अध्यात्माच्या माध्यमातून विकासाच्या वाटेवर आणले.. आणि त्याचेच वैभव आज या ठिकाणी पाहायला मिळाले असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.. तसेच सध्याच्या कालावधीमध्ये अध्यात्मिक सप्ताहाचे व्यासपीठ हे एकमेव पवित्र आहे असे ते म्हणाले.सावरगाव घाट गावकरी मंडळींनी सात दिवस वारकऱ्यांची चोख व्यवस्था केली होती.रहाणे भोजन पंगती, याबरोबर गावातील लग्न झालेल्या सर्व मुलीनी या सप्ताह मध्ये देणगी तसेच अन्नदान केले यामुळे माहेर च्या सप्ताहाचे आगळे वेगळे आकर्षण पहायला मिळाले.

# आधार व्यसनमुक्ती केंद्रामधे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



बीड । प्रतिनिधी

१४ एप्रील २०२५ रोजी आधार व्यसनमुक्ती केंद्रामधे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी केंद्र संचालक तेजस नाना घुमरे, महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटनेचे मार्गदर्शक प्राचार्य डी.जी.तांदळे सर , सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजयजी तांदळे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, बीड बचाव मंचचे मा.नितीनजी जायभाये यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व अभिवादन करून कार्यक्रमास सुरवात झाली व नंतर मान्यवरांचे मार्गदर्शन झाले यावेळी प्राचार्य डी.जी.तांदळे सरांनी डॉ.बाबासाहेबांच्या कार्य विषद करताना शिक्षण, शेती, अर्थ, समाजसुधारणा, कायदे व व्यसनाधिनता या क्षेत्रातील बाबासाहेबांचे उल्लेखनिय कार्य सांगीतले. तसेच उपस्थितांना अध्यात्म व व्यसनाधिनता याची सांगड घालुन व्यसनापासुन दुर राहा असा संदेश दिला. डॉ.संजय तांदळे यांनी व्यसनाधिनतेमधे योगा व ध्यानधारणेचे महत्व पटवुन देऊन मोफत योग शिबीर घेण्याचे अश्वासन दिले. नितीन जायभायेसरांनी डॉ. बाबासाहेबांचे कार्य सांगतानाच युवकांनी शिक्षण व व्यवसायाकडे लक्ष केंद्रीत करून कुटुंबाला सक्षम करावे असा संदेश दिला. यावेळी अध्यक्षीय भाषणात तेजसनाना यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व सुधारणा सांगताना समता व बंधुभाव जपुन स्वाभिमानी जीवन जगण्याचा निर्धार रूग्णांनी करावा व व्यसनमुक्त तथा आनंदी जीवन जगावे हा संदेश दिला. या कार्यक्रमास तेजस नाना घुमरे, प्राचार्य डी.जी.तांदळे सर, डॉ.संजय तांदळे सर, मा.नितीन जायभाये सर, मा.बाजीराव ढाकणे, केंद्र अधिक्षक संजय भडगळे, केंद्र समुपदेशक श्री गणेश जाधव, केंद्रातील रूग्ण आदी उपस्थित होतेण या कार्यक्रमाचे प्रस्ताविक गणेश जाधव यांनी केले, सुत्रसंचालन लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी तर आभार प्रदर्शन संजय भडगळे यांनी केले.

# सौताड्याची माध्यमिक शाळा शिक्षकाविना वाऱ्यावर

## विद्यार्थी सात वाजता तर शिक्षक ८.३० वाजता आले, वेळेबाबत पालकात संभ्रम, गटशिक्षणाधिकाऱ्याकडे तक्रार,केंद्र प्रमुखांकडून पंचनामा

बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सौताडा येथे जिल्हा परिषदेचे हायस्कूल आहे या ठिकाणी जवळपास ३०० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. आजूबाजूच्या खेड्यापाड्यातूनही या ठिकाणी विद्यार्थी मोठ्या संख्येने शिक्षणासाठी येतात. मंगळवारी सकाळी शाळेची सातची वेळ असताना सर्व विद्यार्थी शाळेत उपस्थित झाले. मात्र एकही शिक्षक यावेळी उपस्थित नव्हता. आठ नंतर शिक्षक हळूहळू यायला लागले. ते ८.३० पर्यंत उपस्थित झाले. तत्पूर्वी ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष सानप व ग्रामस्थांनी प्रभारी गटशिक्षणाधिकारी गव्हाणे यांच्याकडे तक्रार केल्यानंतर या ठिकाणी केंद्रप्रमुख लाड यांना पाठवून शाळेचा पंचनामा करण्यात आला. यावेळी २७६ विद्यार्थी उपस्थित होते .मात्र शिक्षक साडेआठला आले. या ठिकाणी १४ शिक्षक आहेत.मात्र एकही शिक्षक वेळेवर आला नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केल्यानंतर याचा पंचनामा करून अहवाल सादर करण्यात आला. यावर गटशिक्षणाधिकारी आणि शिक्षण अधिकारी शिक्षकांवर काय कारवाई करतात? याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे .





बीड जिल्ह्यामध्ये पूर्वी जिल्हा परिषदेच्या शाळा दर्जेदार शिक्षण देणाऱ्या होत्या .जे चांगले विद्यार्थी घडले ते जिल्हा परिषदेच्या शाळेमधूनच घडले. या शाळेत शिकलेले विद्यार्थी अनेक मोठमोठ्या पदावर गेले .मात्र कालांतराने या शाळांना उतरती कळा लागली आजही सौताडा तालुका पाटोदा येथील शाळा उत्कृष्ट आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आजूबाजूच्या गावातून विद्यार्थी येतात.परिसरातील शिंदे वस्ती, भुरेवाडी हनुमान वस्ती आदी गावातूनही या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित असतात. शिक्षण विभागाच्या वतीने एप्रिलमध्ये शाळा भरवण्याचा आदेश आल्यानंतर ही वेळ सकाळी सात ते अकरा ची ठेवण्यात आली. मात्र या शाळेतील काही शिक्षकांनी परस्पर निर्णय घेऊन शाळा ८.३० ला भरवण्याचे ठरवले. मात्र विद्यार्थ्यांना याबाबत कल्पना दिलेली नव्हती.विद्यार्थी नेहमीच्या वेळेत सात वाजता हजर झाले. शिक्षक मात्र कोणीही नाही आणि शाळा बंद आहे हे शिक्षण समितीचे अध्यक्ष आणि ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी संबंधित विभागाला कळवले. काहींनी दूरध्वनीवरून प्रभारी गटशिक्षणाधिकारी गव्हाणे यांना याबाबत ◀◀ पान ३ वर

### पंचनामा करून कार्यालयाला सादर केला

गटशिक्षणाधिकाऱ्यांचे आदेशावरून आपण या शाळेत जाऊन पंचनामा केला. शाळेत गेलो त्यावेळी २७६ विद्यार्थी उपस्थित होते. त्यांची प्रार्थना आम्ही घेतली त्यानंतर हळूहळू आठ तीस पर्यंत शिक्षक यायला लागले अशा स्वरूपाचा पंचानामा आपण करून गट शिक्षणाधिकार्यांकडे सादर केला असल्याचे केंद्रप्रमुख गाडे यांनी म्हटले आहे.

### शिक्षकांना नोटिसा देणार

यासंदर्भात केंद्रप्रमुख गाडे यांनी पंचनामा केला असून या शिक्षकांना कारणे दाखवा नोटीसा देऊन शिक्षकांकडून समर्पक उत्तर आले नाही तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे गव्हाणे यांनी सांगितले.

### शिक्षक उपस्थित नसल्याने तक्रार

सकाळी शाळेच्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी खेळत होते. त्यांच्याकडे चौकशी केली असता आमची शाळा सात वाजता भरते असे विद्यार्थ्यांनी सांगितले. मात्र आठ वाजले तरी एकही शिक्षक उपस्थित नसल्याने मग याची तक्रार गटशिक्षणाधिकारी गव्हाणे यांच्याकडे केली. गव्हाणे यांनी गाडे यांना पाठवून पंचनामा केला आम्ही विद्यार्थ्यांची प्रार्थना घेऊन त्यांना आवारात बसवले .तोपर्यंत शिक्षक आले नव्हते. शिक्षक आठ ते ८.३० दरम्यान शाळेत उपस्थित झाले.असे ते समितीचे सातारा येथील अध्यक्ष माणिक सानप यांनी सांगितले.

## बीडसागवी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बीडसागवी येथे ग्रामपंचायत कार्यालयात विश्वरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वा जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली आहे बीडसागवी गाव महापुरुष चा विचाराचा वारसा जपणारा हे गाव आहे यावेळी आ. सुरेश आणा धस यांचे स्वीह सहाय्यक विकास तात्या साळवे यांच्या हस्ते यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार नारळ अर्पण करून मोठ्या थाटामाटणे जयंती साजरी केली आहे ह्यावेळी बीडसागवी गावचे सरपंच नंदकिशोर कराडे उपसरपंच सोमनाथ घुले सेवा सोसायटी चेअरमन सुभाष तात्या गणगे बबनराव कराडे बारकु ढोबळे कल्याण मोहोळकर सामाजिक कार्यकर्ते विजय डुकरे रियाज शेख ग्रामपंचायत सदस्य दादा साळवे ग्रामपंचायत सदस्य प्रशांत घुमरे ग्रामपंचायत सदस्य ललेश नरवडे पपु दिवटे किरण पारिख जालीधर देवकर बापुराव गणगे विठ्ठल नरवडे पांडुरंग नरवडे प्रकाश साळवे नामदेव नरवडे आणा गणगे सतोष घुले शहादेव चव्हाण बजरंग कराडे ग्रामसेवक चौधरी बीडसागवी येथील भीमनगर चौकात ललेश शेठ नरवडे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार नारळ अर्पण व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला बीडसागवी सरपंच प्रतिमेला पुष्पहार नारळ अर्पण केला व गौतम बुद्धाच्या प्रतिमेला पुष्प वाहिले अर्पण करून मोठ्या थाटामाट्याने जयंती साजरी केली आहे यावेळी पोपट बेरड पपु ढोबळे धनंजय टोनपे परसराम ढोबळे अजित ढोबळे जालीधर मस्के रोहीदास मस्के गहिनीनाथ ऋषिकेश साळवे सुनील दिवटे चिकया मस्के वैभव मस्के प्रतीक साळवे मिलिंद साळवे विजय साळवे रविराज साळवे जगन्नाथ मस्के संजय डुकरे सोमनाथ नरवडे जाफर शेख सदिप साळवे अशोक साळवे यावेळी उपस्थित होते सर्वांचे आभार दादा साळवे यांनी मानले आहे.

## राजकिशोर मोदी मित्र मंडळाच्या वतीने बाबासाहेबांच्या अनुयायांना पिण्याचे पाणी व शरबतचे वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती मोठ्या हर्षोउल्हासात संपूर्ण देशभर साजरी करण्यात आली. अंबाजोगाई शहरामध्ये देखील बाबासाहेबांच्या अनुयायांनी शहराच्या विविध भागातून जयंती मिरवणूक काढली होती. हजारो अनुयायी या मिरवणुकीत सहभागी झाले होते. उन्हाळ्यात गरमीच्या वातावरणामुळे मिरवणुकीत सहभागी झालेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांची पाण्याविना गैरसोय होऊ नये या उद्देशाने राजकिशोर मोदी मित्र मंडळाच्या



वतीने सामाजिक व सर्वधर्मीय सलोखा जोपासत डॉ बाबासाहेबांच्या शोभायात्रेत सहभागी झालेल्या भीम अनुयायांना पिण्याचे थंड पाणी तसेच थंड शरबतचे वाटप करण्यात आले.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मागील अनेक वर्षांपासून अंबाजोगाई शहरातील सर्व भीम अनुयायी मिळून काढत आले आहेत. यामध्ये हजारो महिला, पुरुष व तरुण युवक तथा युवती मोठया प्रमाणावर सहभागी होताना दिसून येतात. या मिरवणुकीतील डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व प्रतिमांचे पूजन राजकिशोर मोदी यांच्या वतीने करून बाबासाहेब आंबेडकराना अभिवादन केले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात येणाऱ्या सर्व मिरवणुकीच्या अध्यक्षांचा सन्मान फेटा बांधून तसेच शाल व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. अंबाजोगाई शहरातील विविध भागांतील भीम अनुयायी तसेच नागरिक मोठ्या प्रमाणावर मिरवनूकी ◀◀ पान ३ वर

## पाणी बचतीची सुरूवात स्वत:पासून करा ;तरच आपल्याला दुष्काळ जाणवणार नाही-तहसिलदार वैशाली पाटील

**आष्टी । प्रतिनिधी**

पंधरा वीस वर्षापुर्वी बोअर जर घेतला तर १५०-२०० फुटापर्यंत लागत होते.आता परिस्थिती बदलली असून,किमान ५००-६०० फुट खोल बोअर घेतला तरी पाणि लागत नाही.पाण्याची ही परिस्थिती भयानक आहे.त्यामुळे शासनाने आयोजित केलेल्या जलव्यवस्थापन कृती पंधरवडा आयोजित केला असून,यातून आपल्याला पाण्याचे महत्व पुढील पिढीला पाणि मिळावे म्हणुन



प्रामाणिक पणे करून येणा-या काळात पावसाचे पाणि जमिनीत सोडून पाणि बचतीची सुरूवात स्वतः पासुन सुरूवात करा तरच आपल्याला दुष्काळ जाणवणारा नसल्याचे प्रतिपादन तहसिलदार वैशाली पाटील यांनी केले.

राज्य शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा केला जात असून,आष्टी तहसिल कार्यालयातील सभागृहात मंगळवार (दि.१५)सकाळी ११.३० वा.आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात तहसिलदार पाटील बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर जलदुत प्रा.राम बोडखे जलसंपदा विभागाचे उप अभियंता वैभव पारखे,नायब तहसिलदार प्रकाश सिरसेवाड,नायब तहसिलदार बाळदत्त मोरे, अश्विनी पडोळे, यांच्यासह आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.पुढे बोलतांना तहसिलदार पाटील म्हणाल्या,या पंधरवड्याच्या माध्यमातून ◀◀ पान ३ वर

## ज्याचं जळतंय त्यालाच कळतंय

### जिल्हा परिषद शिक्षकांच्या पगारासाठी शिक्षकांना प्रतिनियुक्त करा : कास्ट्राईब!

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शासन परिपत्रकानुसार कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा १ ते ५ तारखे दरम्यान करण्यात यावे असा शासन आदेश असताना सुद्धा प्रत्येक महिन्यात जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या पगारासाठी शिक्षक संघटनाना संघर्ष करावा लागत असून शिक्षक मोठ्या प्रमाणात हवालदिल,निराश व कर्जबाजारी झाल्याचे चित्र दिसत आहे.त्यामुळेच "ज्याच जळतंय त्यालाच कळतंय" या उक्ती प्रमाणे शिक्षकाच्या पगारासाठी, ज्या प्रमाणे इतर विभागात अशैक्षणिक कामासाठी शिक्षकांना प्रतिनियुक्त करतात त्याचप्रमाणे या कामीसुद्धा त्यांनाच प्रतिनियुक्त करावे अशी मागणी महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आली आहे.**

प्रत्येक महिन्यात पगार उशिरा होत असल्याकारणाने शिक्षकांना कौटुंबिक उदार निर्वाहसाठी सावकारी व बँकांकडून कर्जबाजारी व्हावं लागत आहे. आणि तो आर्थिक कंगाल होत आहे.त्याची प्रतिष्ठा पणाला लागत आहे.त्यातच यावर्षीच नव्हे तर दरवर्षी भारतरत्न,बोधिसत्व,महामानव भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आधुनिक भारताचे जनक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तसेच मुस्लिम बांधवांच्या पवित्र सण रमजान ईद निमित्त पगार वेळेवर होत नाहीत.या सणांना दरवर्षी शिक्षक संघटनांकडून पगार होण्यासाठी संघर्ष करावा लागतो.निवेदने द्यावे लागतात. याला अपवाद म्हणून यावर्षी मात्र जयंती पूर्वी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार अदा करावेत असे शासनाने आदेश दिले असताना सुद्धा जिल्हा प्रशासनाने योग्य ती कारवाई वेळेत न केल्यामुळे शिक्षकांचे ◀◀ पान ३ वर

## श्री मंगलनाथ मल्टीस्टेटमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट मध्ये दि १४ एप्रिल सोमवार रोजी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्सहात साजरी करण्यात आली.

यांप्रसंगी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अँड.रविंद्र कानडे यांनी आपले विचार मांडताना सांगितले की,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील आर्थिक राजकीय व सामाजिक विषमतेला आळा घालून सर्वाना एकत्र करण्यासाठी यशस्वी कार्य केले स्त्रियांना त्यांचा हक्क



मिळावा करीता संघर्ष केला व समाज साक्षरता अभियान राबवून लोकांना त्यांचा हक्क मिळवून दिला त्यांच्या संघर्षमय जीवन आपण अमलात आणून समाजात संस्थेच्या वतीने आर्थिक साक्षरता अभियान राबवणे व दुर्बल स्त्रियांना आर्थिक साहाय्य करून हक्काबरोबर बरोबर आर्थिक सक्षम बनवण्याचा जयंती निमित्त संकल्प करून आज जयंती निमित्त संकल्प दिन संस्थेत साजरा करण्यात आला.याप्रसंगी संस्थेचे मुख्य सरव्यवस्थापक भिसे,जनरल मॅनेजर आडेपे,वीर व शेंडगे व सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या उत्सहाने उपस्थित होता.



## पिंपळवंडी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

भारतीय संविधानाचे जनक महामानव भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.यानिमित्त येथील ग्रामपंचायत कार्यालय,समाज मंदिर,श्री.स्वामी अमृतभारती विद्यालय,श्री.अश्वलिंग विद्यालय, जिल्हा परिषद शाळा येथे जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी सरपंच निलेश ◀◀ पान ३ वर

## क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त मोरया उद्योग समुहाच्या वतीने ३१ जणांचे रक्तदान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती निमित्त स्वाराती रुग्णालयात मोरया उद्योग समुह अंबाजोगाईच्या वतीने ३१ जणांनी उत्स्फूर्त रक्तदान केले.

मोरया उद्योग समुह अंबाजोगाई यांच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयात १३ एप्रिल २०२५ रोजी १९७ व्या क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्त रक्तदान हे श्रेष्ठदान ही संकल्पना



जोपासण्यासाठी रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. बाहेर गावाहुन रुग्णासाठी ऐन वेळेला रक्त मिळणे ◀◀ पान ३ वर

## अनाथांना सांभाळण्याचे काम संत करतात – ह.भ.प.श्री.संजय महाराज पाचपोर

बीड । प्रतिनिधी

ज्या घरात आदरातिथ्य आहे ते घर चांगले आहे. आई जसे आपल्या मुलांना सांभाळते त्याप्रमाणे संत अनाथांना सांभाळण्याचे काम करतात असे प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प.श्री.संजय महाराज पाचपोर यांनी केले.

सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय दुधाळ, पो.हे.कॉ.गणेश दुधाळ यांच्या मातोश्री कै.सौ.कुसुमबाई भिमराव दुधाळ यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त ह.भ.प.रामायणाचार्य श्री.संजय महाराज



पाचपोर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले. किर्तनासाठी त्यांनी संत तुकाराम महाराजांचा अभंग घेतला. यावेळी ह.भ.प.श्री.बळीराम महाराज, रामानंद पुरी महाराज, राजू महाराज वाघमारे, लक्ष्मण महाराज फड, बबन महाराज, विठ्ठल महाराज, परशुराम महाराज, नाना महाराज, हरीदास जोगदंड, मकरंद महाराज जोशी, अरूण डाके, विलास बडगे, गंगाधर घुमरे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, हेमंत क्षीरसागर, किशोर पिंगळे, संजय गव्हाणे, आशिष ◀◀ पान ३ वर

## शेतकऱ्यांनी गाळ टाकून जमिनीची सुपीकता वाढवावी, प्रकल्पाचा पाणीसाठा देखील वाढेल –आ.सुरेश धस

### शेतात गाळ टाकणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यात हेक्टरी थेट अनुदान जमा होणार –जिल्हाधिकारी अविनाश पाठक

**आष्टी । प्रतिनिधी**

रूटी मध्यम प्रकल्प परिसरातील शेतकरी हा अत्यंत कष्टाळू आहे. या शेतकऱ्यांनी अनेक प्रयोग केलेले आहेत केळसांगवी या गावी विजया घुले यांनी पतीच्या निधनानंतर अत्यंत कष्ट करून शेती तून उत्पन्न काढले आहे त्यांनी सफरचंद आणि खजुराचा प्रयोग केलेला आहे.तसेच ड्रॅगन फ्रुट मधून त्यांनी चांगले उत्पन्न मिळवले आहे त्यामुळे रूटी प्रकल्पाची उंची वाढवायची आहे असा माझा उद्देश असून या तलावातील गाळ मोठ्या प्रमाणावर उपसा झाल्यास



शेतकऱ्यांच्या जमिनीचा पोत सुधारणार असून गाळ काढल्यामुळे तलावातील पाणीसाठा वाढणार असल्याचे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले आहे.

यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मृदा व जलसंधारण विभाग कार्यकारी अभियंता आमले,आष्टी तहसीलदार वैशाली पाटील,अंबेजोगाई मानवलोक संस्थेचे अनिकेत लोहिया,डॉ.आंबेडकर फोरमचे यशवंत खंडागळे,प्रविण वारे,सरपंच अजित घुले,माजी सरपंच महादेव पडोळे,माजी सरपंच गंगाधर पडोळे, बाळासाहेब बोराडे,उपसरपंच माऊली पडोळे, अंगद पडोळे आदी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आ.म्हणाले, परिसरातील ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुरंदर विमानतळाबाबत अडचणी जाणून घेण्यासाठी बैठकांचे नियोजन; मात्र ग्रामस्थांनी फिरवली पाठ

**सासवड । प्रतिनिधी**

पुरंदर विमानतळ हे सुरुवातीपासून वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, कुंभारवळण अशा सात गावांमध्ये शासनाने विमानतळ प्रकल्प करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. मात्र यासाठी गावकऱ्यांचा सुरुवातीपासून विरोध आहे. पुरंदर विमानतळाची घोषणा झाल्यानंतर त्यादृष्टीने कामांचा सपाटा लावला आहे. नागरिकांचे मतपरिवर्तन करणे तसेच शासनाची भूमिका मांडणे आणि स्थानिक नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी प्रत्येक गावात बैठकांचा धडाका सूर करण्यात आला आहे. स्थानिकांनी मात्र प्रशासनाच्या या प्रयत्नांकडे पूर्णपणे पाठ फिरवली आहे.



पुरंदर विमानतळ तयार करण्यासाठी ग्रामस्थांच्या अनेक प्रश्न आणि अडचणी आहेत. यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र स्थानिक ग्रामस्थांनी त्यास तीव्र विरोध केला असून शासकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीवर बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांना कोणत्याही चर्चेविना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. मागील पंधरवड्यात शासनाने विमानतळ प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सातही गावांचा ड्रोन सर्व्हे करण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली होती. त्यानंतर आता पुन्हा नव्याने जमिनीवरील सर्व्हे करण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे एकीकडे पाऊल टाकत असतानाच दुसरीकडे शासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून चर्चेचे दरवाजे उघडे करण्यात आले आहेत. त्यासाठी गावोगावी बैठकांचा धडाका लावला आहे.

नागरिकांकडून विरोधाची भूमिका कायम

भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे, पुरंदरच्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे, भोर विभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे, पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी, भूमी अभिलेख अधीक्षक स्मिता गौड तसेच यांच्यासह नायब तहसीलदार, विविध विभागांचे अधिकारी पोलीस फौजफाटा घेवून प्रत्येक गावात आढावा घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. मागील आठवड्यापूर्वी सुरुवातीला एखतपूर - मुंजवडी गावात बैठक घेतली. त्यास नागरिकांनी उपस्थिती दाखवीत जमीन देण्यास नकार दिला होता. त्यानंतर सासवड येथे तीन दिवसांचे उपोषण केले होते. अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने उपोषण मागे घेतले. तसेच जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्याशी चर्चाही केली मात्र त्यामधून कोणतेच सामाधान झाले नाही त्यामुळे विरोधाची भूमिका कायम ठेवण्यात आली.

अधिकारी पुन्हा परतले रिकाम्या हाताने दरम्यान वनपुरी येथे आयोजित केलेल्या बैठकीत अपवाद वगळता नागरिकांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच शनिवारी १२ रोजी खानवडी आणि कुंभारवळण येथे बैठक आयोजित केली मात्र गावातील तिकडे फिरकले नसल्याने अधिकाऱ्यांना पुन्हा रिकाम्या हाताने परतावे लागले आहे. दरम्यान १४ एप्रिल रोजी सकाळी वनपुरी, उदाचीवाडी त्यानंतर पारगाव येथे बैठक आयोजित केल्याचे पत्र प्रांताधिकारी वर्षा लांडगे यांनी संबंधित गावच्या ग्रामसेवकांना दिले आहे. मात्र ग्रामस्थांनी कोणीही बैठकीस हजर राहणार नाही असे शासनाला कळविले असून गावोगावी ग्रामसभा घेवून विमानतळास विरोध असल्याचे ठराव करून अधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत. त्यामुळे आता शासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## खेळण्यातील पिस्तुलाचा धाक दाखवून ज्वेलर्सचे दुकान लुटले; ३५ लाखांचे सोने लंपास



**पुणे । प्रतिनिधी**

धायरी येथील सराफ दुकानात खेळण्यातील पिस्तूलाचा धाक दाखवून दरोडा टाकण्यात आला. येथून तब्बल २५ ते ३० तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरुन नेण्यात आले. त्याची अंदाजे किंमत ३५ लाख रुपये आहे. याप्रकरणी नोंदड सिटी पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेची पथके तपासासाठी रवाना झाली आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, विष्णू सखाराम दहिवाल यांचे धायरीतील रायकर मळा येथील काळुबाई चौकात श्री सराफ नावाची सराफी पेढी आहे. दुपारी पावणे तीनच्या सुमारास ते कामगारासह उपस्थित होते. तेव्हा एक व्यक्ती सोन्याची चेन दाखवा म्हणून दुकानात आली. त्याच्या पाठोपाठ आणखी दोन व्यक्ती दुकानात घुसले. त्यांनी हातातील पिस्तूल दाखवून धमकी देत सोन्याचे ३० तोळे वजनाचे दागिने जबरदस्तीने चोरले.

दुकान मालकाने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, त्याला हाताने आणि पिस्तूलच्या दांड्याने मारहाण करण्यात आली. यानंतर तीघेही आरोपी दुचाकीवरुन पळून गेले. दुकानमालकाने तातडीने पोलिसांना खबर दिली. पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले, तेव्हा त्यांना पिस्तूलचा दांडा मिळाला.

त्यावरुन हे पिस्तूल खेळण्यातले असल्याचे निष्पन्न झाले. परिसरातील सीसीटीव्ही आरोपी दुचाकीवरुन जाताना दिसून येत आहेत. मागे बसलेल्या व्यक्तीच्या पाठिवर एक सॅकही दिसत आहे. तीन्ही आरोपींचे वय २५ ते ३५ दरम्यान होते. याप्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल बोस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

## कुदळवाडीतील लघुउद्योजकांचे पुनर्वसन करा; आमदार महेश लांडगे यांच्या PCMC ला सूचना

**पिंपरी । प्रतिनिधी**

कुदळवाडीमध्ये महानगरपालिका प्रशासनाने सरसटक अतिक्रमण कारवाई केली. या कारवाईत अवैध भंगार दुकाने हटवण्यात आली. त्यात काही लघु उद्योजकांचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे भोसरी एम.आय.डी.सी. आरक्षण क्रमांक ४० प्लॉट क्रमांक टी. २०१ येथे लघु उद्योजकांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी भाजप नेते तथा आ. महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून भोसरी एम.आय.डी.सी. आरक्षण क्रमांक ४० प्लॉट क्र. टी. २०१ येथे लघु उद्योजकांचे पुनर्वसन करण्यासाठी इमारत उभारण्याचे काम प्रस्तावित आहे. सदर कामाला दि. १६ जून २००८ रोजी कार्यदिश




देण्यात आला आहे. मात्र, काम अद्याप अपूर्ण आहे. सदर प्रकल्पामध्ये दोन इमारती असून, २०८ औद्योगिक गाळे नियोजित आहे. गाळ्यांचे क्षेत्रफळ २९२ ते ६३० चौ. फुटापर्यंत इतके आहे. वरील मजल्यावर वाहतुकीसाठी रॅम्प, फायरफायटिंग सिस्टम व लँडस्केपिंग अशा सुविधा देण्यात येणार आहे. मेटेरिअल व पॅसेंजर लिफ्टचीही सुविधा राहणार आहेत.

महापालिकेच्या धोरणानुसार गाळ्यांचे वितरण

महापालिकेच्या धोरणानुसार, या प्रकल्पातील गाळ्यांचे वितरण पुनर्वसनास पात्र गाळे धारकांना करण्यात येणार आहे. उर्वरित गाळे लिलाव पद्धतीने वितरीत करण्याचे प्रस्तावित आहे. या इमातीमध्ये २०८ गाळे निर्माण करण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रस्तावित इमारतीचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी आमदार लांडगे यांनी पाठपुरावा सुरू केला आहे.

अन्नदानाच्या उपक्रमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी

पुणे : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या दिवशी डिजे वाजविण्यावर होणार खर्च टाळून अन्नदानाचा उपक्रम राबवित विधायक पध्दतीने साजरी करण्यात आली आहे. सिंहगड रोड, सर्व्हे, नंबर १३३ मध्ये नवरत्न तरुण मंडळ व रमाई प्रतिष्ठान च्या वतीने हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे.

त्यात डिजे तसेच डॉल्बीचा अनावश्यक खर्च टाळून अन्नदान हेच सर्वश्रेष्ट दान समजून परिसरातील नागरिकांसाठी महाभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून कौतूक करण्यात आले.

## किरकोळ वादातून मारहाण; बॅटने हल्ला करून महिलेस गंभीर दुखापत

**पिंपरी । प्रतिनिधी**

मुलांमध्ये झालेल्या किरकोळ वादातून सुरू झालेल्या भांडणाचे पर्यवसान महिलेस बॅटने मारहाण करून गंभीर दुखापत करण्यात झाले. या प्रकरणी थेरगाव येथील तिघांविरुद्ध काळेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १० एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास संदिपनगर, थेरगाव येथे घडली.

या प्रकरणी एक महिला फिर्यादी म्हणून पुढे आल्या असून, अनिल कांबळे व दोन महिला आरोपी (सर्व रा. संदिपनगर, थेरगाव, पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या मुलीचा लहान मुलगा आणि आरोपींची मुले यांच्यात किरकोळ वाद झाला होता. त्यातूनच आरोपी महिला क्रमांक २ व ३ यांनी फिर्यादीच्या मुलीला शिवीगाळ करून हाताने मारहाण केली.



सायंकाळी ६ वाजता फिर्यादी आरोपींच्या घरी जाऊन माझ्या मुलीला का मारहाण केली? असे विचारत असताना पुन्हा दोघी आरोपी महिलांनी फिर्यादी व त्यांच्या मुलीला शिवीगाळ करत मारहाण सुरू केली. या दरम्यान, आरोपी अनिल कांबळे याने घरातून बॅट आणून फिर्यादीच्या डाव्या हातावर जोरदार मारहाण केली. त्यामुळे त्यांचा डावा हात फ्रॅक्चर होऊन गंभीर दुखापत झाली. त्याचप्रमाणे त्यांच्या मुलीला डाव्या हातावर व कमरेवर बॅटने मारहाण करण्यात आली. भांडण सोडवण्यासाठी पुढे आलेल्या एका साक्षीदाराच्या पाठीवरही बॅटने मारहाण करून जखमी करण्यात आले.

पिंपरीमध्ये घडली धक्कादायक घटना

रागाने बघितल्याच्या कारणावरून चौघांनी एका तरुणावर कुऱ्हाडीने वार केले. यामध्ये तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना रात्री सव्वा नऊ वाजताच्या सुमारास जुनी सांगवी येथे घडली. अनिष धनंजय ढवळे (वय २१, रा. जुनी सांगवी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्यांनी याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार शैबाज शेख (वय २१, रा. बोपोडी), विराज काटे (वय २०, रा. औंध), आदित्य, बल्ल्या (पूर्ण नाव पत्ता माहिती नाही) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अनिष हे जुनी सांगवी येथे ओम कलेक्शन दुकानासमोर भेळ खात थांबले होते. तिथे आरोपी आले. अनिष हे आरोपींकडे रागाने बघत असल्याच्या संशयावरून आरोपींनी अनिष यांच्यावर कुऱ्हाडीने वार केले. यात अनिष गंभीर जखमी झाले. त्यानंतर आरोपींनी कुऱ्हाड हवेत फिरवून दहशत निर्माण केली. पोलिसांनी विराज काटे याला अटक केली आहे. सांगवी पोलीस तपास करीत आहेत.

## आधी असभ्य वर्तन आता मागितली माफी; परदेशी पर्यटकाला शिवीगाळ करायला लावणाऱ्या त्या तरुणाचा व्हिडिओ व्हायरल

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील सिंहगड किल्ल्यावर न्यूझीलंडहून आलेल्या परदेशी पर्यटकासोबत काही टवाळखोर तरुणांनी असभ्य वर्तन करत त्याला मराठीतून शिव्या देण्यास भाग पाडल्याची घटना घडली होती. खरंतर ही घटना ३ एप्रिल रोजी घडली होती. मात्र, त्या संबंधीचा व्हिडिओ नुकताच व्हायरल झाल्याने हा निंदनीय प्रकार उजेडात आला.



सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओत काही तरुण सिंहगडावर न्यूझीलंडहून आलेल्या परदेशी पाहुण्याशी असभ्य वर्तन करुन त्याला मराठीत शिव्या देण्यास भाग पाडल्याचे दिसते. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर सर्वच स्तरातून टीकेची झोड उठली होती. संबंधित तरुणांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात होती. अखेर हवेली पोलिसांत चार तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

यापैकी एका तरुणाने माफी मागितल्याची माहिती मिळत आहे. परदेशी पाहुण्याचा यूट्यूब चॅनेल असल्याने त्याने इथला संपूर्ण व्हिडिओ पोस्ट केला. यानंतर त्यातील टवाळखोर तरुणांनी शिव्या दिल्याचा भाग प्रचंड व्हायरल झाला होता.


तरुणाने मागितली माफी

माझ्याकडून खूप मोठी चुकी झाली आहे. मला भानच राहिलं नाही की मी गड किल्ल्यावर आहे. आणि नादामध्ये मित्रा मित्रांमध्ये घाण शिव्या दिल्या. नादामध्ये खूप मोठी चुकी झाली. प्लिज मला माफ करा असे म्हणत त्या मुलाने व्हिडिओ करुन माफी मागितली आहे. ३ एप्रिल या दिवशी न्यूझीलंडहून पुण्यातील सिंहगड किल्ल्यावर यूट्यूबर ल्युकेथ हा तरुण पाहुणा आला होता. त्यावेळी येथे छत्रपती संभाजीनगर येथील आठ ते दहा जणांचा ग्रृपही आला होता. यातीच काही टवाळखोर तरुणांनी न्यूझीलंडहून आलेल्या पाहुण्यासोबत गप्पा मारायला सुरूवात केली. यानंतर त्याला मराठीतून शिव्या देण्यास भाग पाडलं. पर्यटकाला मराठी येत नसल्याने तरुणांनी दिलेल्या शिव्या त्याने म्हटल्या. यानंतर हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता.

## १०० कोटींच्या डीलसाठी गेले ते परतलेच नाही; पुण्यातील उद्योजकाची बिहारमध्ये हत्या

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील कोथरूड परिसरात राहणार्या एका मराठी उद्योजकाची बिहारमध्ये हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. संबंधित व्यावसायिक पुणे अभियांत्रिकी महाविद्यालय (सीओइपी)चे माजी विद्यार्थी होते. लक्ष्मण साधू शिंदे (वय ५५, रा. डीपी रस्ता, कोथरूड) असे हत्या झालेल्या उद्योजकाचे नाव आहे. ते रत्नदीप कास्टिंगचे संस्थापक म्हणून कार्यरत होते.



तब्बल १०० कोटी रुपयांच्या ऑर्डरसंदर्भात चर्चा करण्यासाठी ते बिहारला गेल्यापासून ते बेपत्ता झाले होते. अखेर त्यांचा मृतदेह आढळून आला असून, आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. याप्रकरणी खूनाचे नेमके कारण पोलिसांकडून शोधले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी काही दिवसांपुर्वी उद्योजक लक्ष्मण शिंदे यांना झारखंडमधील खाण उपकरणांशी संबंधित सुमारे १०० कोटी रुपयांची ऑनलाईन ऑर्डर दिली होती. त्यानंतर चर्चेसाठी त्यांना बिहारमधील पटना येथे आमंत्रित केले होते. त्यानुसार ११ मार्चला शिंदे हे विमानाने पटना येथे पोहोचल्यानंतर, त्यांनी संबंधित व्यक्तींसोबत चर्चा केली.

त्या रात्री त्यांची कुटूंबियासोबत बोलणे झाले होते. मी झारखंडला चाललो आहे, त्याठिकाणी खाणकाम प्लँटमध्ये मशीनरीचे काम पाहण्यासाठी जाणार आहे. त्यानंतर त्यांचा कुटूंबियासह इतरांसोबत कोणाशीही संपर्क झाला नाही. तसेच त्यांच्या फोनवरून पाठवलेले सर्व मेसेज डिलीट केले. आरोपींने त्यांचे अपहरण करुन दूरच्या ठिकाणी नेले. त्यांच्या बँकखात्यातून रक्कम वर्ग करुन घेत त्यांची हत्या केल्याची माहिती पटना पोलिसांनी दिली आहे.

## तरुणीच्या हत्या प्रकरणातील आरोपी गजाआड; सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पोलिसांनी घेतला शोध

**पुणे । प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील अकरावीत शिकणाऱ्या अल्पवयीन तरुणीच्या खून झाल्याच्या घटनेने मोठी खळबळ उडाली होती. या हत्या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली अ्सून महाविद्यालयीन तरुणीचा खून करुन पसार झालेल्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

नवनाथ मांजरे (वय २९) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याला सोमवारी न्यायालयात हजर करण्यात आले. त्याला न्यायालयाने नऊ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. खेड तालुक्यातील मांजरेवाडीत नदीपात्रात तरुणीचा खून करण्यात आला. नराधमाने तरुणीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तरुणीने त्याला विरोध केल्यान्तर आरोपीने तिच्या डोक्यात दगड घालून तिचा खून केला. यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला होता.



पोलिसांनी या प्रकरणी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. एका सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी पोलिसांच्या नजरेस पडला. यानंतर पोलिसांनी आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. मिळालेल्या माहितीनुसार, तरुणीला दुचाकीवरुन सोडण्याची बतावणी करुन आरोपीने तिला नदीपात्रात नेले होते.

घटना कशी घडली?

सदर घटना ही शुक्रवारी ११ एप्रिल रोजी घडली. नेहमीप्रमाणे तरुणी महाविद्यालयात आली होती. महाविद्यालयातून सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास ती घरी निघाली होती. त्यावेळी आरोपी मांजरे दुचाकीवरुन आला. त्याने तिला दुचाकीवरुन घरी सोडते अशी बतावणी करुन शेताला पाणी द्यायचे आहे, असे सांगून मांजरेवाडी पिंपळ-मलघेवाडीतील नदीकाठी असलेल्या उसाच्या शेतात नेले. तेथे युवतीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तरुणीने विरोध दर्शविल्यानंतर त्याने तिच्या डोक्यात दगड घालून खून केला.

..अन् भिंग फुटले

यानंतर आरोपीने तरुणीचा मृतदेह १५० फूट ओढत नेत भीमा नदीपात्रात फेकून दिला. त्यानंतर आरोपी मांजरे गावात आला. येथील जऊळके गावातील यात्रेत गेला. मांजरे याचे गावात नारळ विक्रीचे दुकान आहे. माझ्या शेतात महिलेचा ओरडण्याचा आवाज आला आहे. मी घाबरुन तिकडे गेलो नाही, अशी बतावणी केली. मात्र, त्याचे बिंग फुटले आणि पोलिसांनी त्याला अटक केली.

## शेताच्या बांध्याजवळ लिंबू-नारळ, बाहुल्या; जादूटोण्याच्या प्रकाराने परिसरात खळबळ

शिरूर, कवठे येमाई: पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील कवठे येमाई च्या घोडे,भाईक वस्ती नजीकच्या एका शेतकऱ्याच्या शेताच्या बांधा नजीक ५ नारळ,५० साठ लिंबे, त्यावर टाचण्या,दाभण टोचलेल्या,कणकेच्या केलेल्या ५,६ छोट्या बाहुल्या, काही दारूच्या बाटल्या,व तत्सम जादू टोना केलेलं साहित्य आज रविवार दि. १३ ला सकाळी संबंधित शेतकरी संपत मोहन भाईक यांना आढळून आले. ते टोमॅटो पीक घेण्यासाठी तयार केलेल्या आपल्या शेता नजीकच्या बांधावरील वाळलेले गवत व कचरा जाळताना हा अघोरी प्रकार आज सकाळी त्यांच्या निदर्शनास आला.

संपत भाईक तात्काळ २ किमी अंतर असलेल्या त्या शेताच्या ठिकाणी गेले.संबंधित वस्तूंची पाहणी करीत हे सर्व थोतांड व अंधश्रद्धेचा प्रकार असून घाबरून जाऊ नका असा उपस्थित शेतकऱ्यांना दिलासा दिला.त्यानंतर या घटनेबाबत अंध श्रद्धा निर्मूलन समितीच्या महाराष्ट्र प्रदेश राज्य कार्यकारिणी सदस्या नंदिनी जाधव व शिरूरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांना ही माहिती देण्यात आली.

नंदिनी जाधव यांनी कवठे येमाईचे शेतकरी संपत भाईक यांच्या शी मोबाईल वरून थेट चर्चा करीत हा अंधश्रद्धेचा प्रकार असून घाबरून जाऊ नका असा दिलासा दिला. त्यानंतर शेतकरी संपत भाईक व त्यांचा घरगडी लक्ष्मण यांनी हे सर्व साहित्य शेताच्या कडेला नेत वाळलेल्या गवतावर ठेवत पेटवून दिले.हा प्रकार अष्टविनायक महामार्गाच्या नजीकच झाल्याने बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

दरम्यान दोन आठवड्यांपूर्वी सांगलीतील इस्लामपूरमध्येही असाच जादूटोण्याचा प्रकार उघडकीस आला होता. इस्लामपूर येथील उरूण भागात एका महिलेच्या घराबाहेर जादूटोणा आणि करणीसदृश साहित्य आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. हा प्रकार समजताच नागरिकांनी त्या ठिकाणी पाहणीसाठी मोठी गर्दी केली. मात्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ हस्तक्षेप केला. त्यांनी कुटुंबीयांसह लोकांचे प्रबोधन करत, पोलिसांच्या उपस्थितीत ते सर्व साहित्य बाजूला केले आणि परिसरात पसरलेले भीतीचे वातावरण दूर करण्याचा प्रयत्न केला.

सदर महिलेच्या घराबाहेर विचित्र स्वरूपाचे साहित्य ठेवलेले होते. त्यांच्या बकऱ्याचे डोके आणि चार पाय रंगीत दोरीने दरवाजाच्या बाहेर टांगलेले होते. त्यावर लिंबू, टाचण्या आणि सुया टोचलेल्या होत्या. दरवाजाजवळ तीन नारळांवर काळ्या बाहुल्या बांधून त्यावरही टाचण्या टोचलेल्या होत्या. २१ अर्धवट कापलेले लिंबू, मिरच्या, काट्यांची फांजर, मोडलेली फांदी, पपई, कोरफडीचे तुकडे, तसेच हळद, कुंकू आणि गुलाल यांचा वापर त्या ठिकाणी झालेला दिसून आला. या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## रुग्णवाहिकेची दुचाकीला जोरदार धडक, दोन जणांचा मृत्यू

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

राज्यात अपघाताचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून अपघाताच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुणे जिल्ह्यातून एक अपघाताची मोठी बातमी समोर आली आहे. सणसवाडी (ता. शिरुर) येथील पुणे-नगर महामार्गावरून शिरुर येथील एका हॉस्पिटलमधून रुग्णाला पुणे येथे घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेची दुचाकीला जोरदार धडक बसली. या अपघातात रुग्णवाहिकेतील रुग्णासह दोन नातेवाईक आणि अन्य तिघे गंभीर जखमी झाले आहेत. यात रुग्णाच्या एक नातेवाईक जागीच ठार झाला आहे. तर एका जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. घटनेनंतर रुग्णवाहिकाचालक फरार झाला आहे. याबाबत शिक्रापूर पोलीस ठाण्यात सौरभ संतोष महाजन या रुग्णवाहिका चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सणसवाडी (ता. शिरुर) येथील पुणे-नगर महामार्गावरून एम एच १२ डब्ल्यू जे १७९५ या रुग्णवाहिकेने चालक सौरभ महाजन हा गुरुवारी (दि. १०) रात्री शिरुर येथील रमेश काशिनाथ राठोड या रुग्णाला घेऊन पुण्याच्या दिशेने चालला होता. दरम्यान, सणसवाडी रुग्णवाहिका चालकाचे नियंत्रण सुटून रुग्णवाहिकेची एम एच १२ १४ एम ५२८५ या दुचाकीला जोरात धडक बसून अपघात झाला. यात दुचाकीवरील गोविंद श्रीरंग पोळ व सुरज गणेश जगदाळे दोघांसह रस्त्या जवळील ऋषिकेश गणेश जाधव ((तिघे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे) हे गंभीर जखमी झाले. तर रुग्णवाहिकेतील रुग्ण रमेश काशिनाथ राठोड, त्याचे नातेवाईक विकी रमेश राठोड, उषा रमेश राठोड (सर्व रा. रांजणगाव गणपती ता. शिरुर जि. पुणे) हे गंभीर जखमी झाले. तर रुग्णासोबत आलेला नातेवाईक सुमित बळीराम चव्हाण (वय २८ रा. रांजणगाव गणपती ता. शिरुर जि. पुणे) हा जागीच ठार झाला.



सर्व जखमींवर वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर शुक्रवारी (दि. ११) दुपारच्या सुमारास जखमी गोविंद श्रीरंग पोळ (रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याबाबत जगन्नाथ बबनराव खोपकर (वय ६१ रा. सोलापूर रोड फातिमानगर पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी रुग्णवाहिका चालक सौरभ संतोष महाजन (रा. शिरुर ता. शिरुर जि. पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार रविकिरण जाधव हे करत आहेत.